रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ११
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २८ जुलै २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
पनवेलच्या डॉक्टरांनी पंढरीत दिली आरोग्यसेवा/३
मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांना किचन गार्डन किट/६
आयएसएसएफ विश्वचषकात ईशा सिंगचा 'सुवर्ण'वेध/८

## बाजारात येणार १०, २० रुपयांच्या प्लास्टिक नोटा



**नवी दिल्ली :** देशभरात १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिक (पॉलिमर) नोटांची फील्ड ट्रायल करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून हा केवळ प्रायोगिक उपक्रम आहे. सध्या चलनात असलेल्या कागदी नोटा बंद करण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नाही, असेही सरकारने स्पष्ट केले आहे. लोकसभेत एका लेखी उत्तरात केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी सांगितले की, आरबीआयच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. याअंतर्गत १० आणि २० रुपयांच्या पॉलिमर नोटा जारी करून भारतीय हवामान, वापर आणि व्यवहारांच्या परिस्थितीत त्यांचा टिकाऊपणा आणि कार्यक्षमता तपासली जाणार आहे. पॉलिमर नोटा या विद्यमान कागदी नोटांसोबतच चलनात राहतील. फील्ड ट्रायल यशस्वी ठरल्यासच भविष्यात या नोटा मोठ्या प्रमाणावर जारी करण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

# एमपीएससीचा पेपर फुटलाच नाही

## तक्रारदाराकडून दावा मागे; आयोगाची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरती प्रक्रियेतील कथित पेपरफुटी प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार करणाऱ्याने ही प्रश्नपत्रिका फुटली नसल्याचे म्हटले आहे.


याबाबत आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार २२ मार्च रोजी औषध निरीक्षक भरतीची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल १२ जूनला जाहीर झाला. त्यानंतर १ ते २१ जुलै या कालावधीत पात्र उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या आणि २२ जुलै रोजी पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली. तत्पूर्वी एक दिवस अगोदर गौरव पाटील नावाच्या ई-मेल आयडीवरून पेपर फुटल्याची मोघम तक्रार आली व याचा लाभ एका उमेदवाराला झाला असल्याचे सांगण्यात आले. या अनुषंगाने अधिकचे पुरावे मागितल्यानंतर २३ जुलै रोजी काही पुरावे ई-मेलद्वारे सादर करण्यात



आले. या पुराव्यांच्या चौकशीसाठी आयोगाने २७ जुलै रोजी तक्रारदार व संबंधित उमेदवाराला बोलावले होते, मात्र दोघेही अनुपस्थित राहिले.

दरम्यान, तक्रारदाराकडून आयोगाला प्राप्त झालेल्या ताज्या ई-मेलमध्ये ही तक्रार ऋषिकेश गांगर्डे नावाच्या मित्राने भ्रम पसरवण्यासाठी केली असून तो उत्तीर्ण झालेला नाही. संबंधित चॅट केवळ चेष्टेच्या स्वरूपाचे होते, असा खुलासा करण्यात आल्याचेही हरपाळकर यांनी सांगितले.

### 'पोलिसांत तक्रार देणार'



पेपरफुटीसंदर्भातील प्रकरण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने अत्यंत गांभीर्याने घेतले असून संबंधित तक्रारदाराने दिलेले पुरावे, उमेदवाराने सादर केलेले म्हणणे, इतरही काही तक्रारदार, उमेदवार यांनी ई-मेलद्वारे केलेल्या तक्रारी, निवेदने आम्ही एकत्र करून संबंधितांविरोधात पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल करणार आहोत, असे आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी स्पष्ट केले आहे.

## सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक लोकसभेत सादर; विरोधकांचा गदारोळ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक लोकसभेत सादर केले, मात्र विधेयक सादर होताच विरोधकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केल्याने लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज वारंवार तहकूब करावे लागले.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी लोकसभेत हे विधेयक मांडले. देशभरातील स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी विधेयकात कठोर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विधेयकानुसार पेपरफुटीत सहभागी असलेल्या आरोपींना १० वर्षांपर्यंत कारावास आणि १० कोटी रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो तसेच परीक्षा प्रक्रियेत गैरव्यवहार करणाऱ्या सेवा पुरवठादार कंपन्यांना आठ वर्षांसाठी



काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे विधेयकावर सविस्तर चर्चा होऊ शकली नाही. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षांना शांततेत चर्चा करण्याचे आवाहन करत "अशा महत्त्वाच्या विधेयकावर सभागृहात सखोल चर्चा होणे आवश्यक आहे," असे मत व्यक्त केले.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जनआरोग्य शिबिर उत्साहात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस तथा लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा वसा जपत पनवेलमध्ये जनआरोग्य शिबिराचे आयोजन पक्षाच्या वतीने सोमवारी (दि. २७) करण्यात आले होते. शहरातील डॉ. गुणे हॉस्पिटलजवळील भाजी मार्केट येथे झालेल्या या शिबिराचे उद्घाटन प्रमुख मान्यवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून शेकडो नागरिकांनी आरोग्य सुविधांचा लाभ घेतला. या उपक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर





यांनी सदिच्छा भेट देत आयोजकांचे कौतुक केले.

सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा सहज उपलब्ध व्हावी आणि विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही नेत्रोपचाराचा लाभ मिळावा या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये आरोग्य तपासणीसोबत अनुभवी नेत्रतज्ज्ञांकडून मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्म्यांचे वाटप, तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी तपासणी, नोंदणी आणि मार्गदर्शन करण्यात आले.

व्हिजन फ्रेंड साकीब गोरे यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या 'देवाभाऊ चष्मा' या विशेष उपक्रमांतर्गत "गरजू तिथे चष्मा आणि मोतीबिंदू निवारण" हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून नागरिकांना आवश्यक नेत्रसेवा उपलब्ध करून देण्यात आली. समाजकारण आणि लोकसेवा हीच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सार्वजनिक जीवनाची ओळख असून त्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान, आरोग्यसेवा, सामाजिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन अशा विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आयोजित या जनआरोग्य शिबिराला नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.

यावेळी शिबिराच्या संयोजिका नगरसेविका दर्शना भोईर यांनी उपस्थित मान्यवर आणि शिबिरार्थींचे स्वागत करून शिबिराच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला.

उपक्रमावेळी भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष नगरसेवक सुमित झुंजारराव, माजी नगरसेवक जगदीश गायकर, कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष रवींद्र नाईक, मधुकर उरणकर, सपना पाटील, कविता ठाकूर, कविता पाटील, जयश्री कामरेकर, नीता मंजुळे यांच्यासह पदाधिकारी, वैद्यकीय तज्ज्ञ, स्वयंसेवक, महिला पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजातील गरजू घटकांपर्यंत आरोग्यसेवा पोहचविणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून अशा समाजोपयोगी कार्यक्रमांमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

## निवडक

### आसाममधील पूरबळींचा आकडा ६८वर, ७६३ गावे पाण्याखाली

**दिसपूर :** आसाममध्ये पुरामुळे प्रचंड हाहाकार पाहायला मिळत आहे. पुरामुळे मृत्यू झालेल्यांची संख्या वाढून आता ६८वर पोहचली आहे. पाच जिल्ह्यांतील ५.२४ लाखांहून अधिक नागरिक अजूनही पुराच्या विळख्यात आहेत. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार सध्या राज्यातील ७६३ गावे पुराच्या पाण्याखाली गेली असून ५,२४,७००हून अधिक नागरिक बाधित झाले आहेत. प्रशासनाकडून बचाव व मदतकार्य सुरू आहे.

### टीईटी पेपरफुटीप्रकरणी आरोपीचे आत्मसमर्पण

**ठाणे :** टीईटी परीक्षा पेपरफुटीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीने सोमवारी (दि.२७) अचानक भिवंडी न्यायालयात आत्मसमर्पण केले. सोनू कुमार दिवाकर असे या आरोपीचे नाव आहे. यामुळे अटक आरोपींची संख्या १५वर पोहचली आहे. यामध्ये मुख्य सूत्रधार बिजेंद्र गुप्ताचासुद्धा समावेश आहे. सोनू पोलिसांना गुंगारा देत होता, पण मुख्य आरोपी गुप्ताला अटक झाल्याने पोलीस कधीही आपल्यापर्यंत पोहचतील या भीतीने अखेर सोनूने आत्मसमर्पण केले. संपूर्ण प्रकरणाचा तपास वेगाने सुरू आहे.

## अलिबागमध्ये तब्बल चार कोटींची व्हेल माशाची उलटी जप्त; आरोपी ताब्यात

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चाळमाळा येथे गस्तीवर असलेल्या पोलिसांनी कारवाई करून चार किलोग्रॅम वजनाची व्हेल माशाची उलटी जप्त केली. बाजारभावानुसार याची किंमत चार कोटी रुपये आहे. याप्रकरणी पोलिसांनी राहुल पंढरीनाथ हातणी याला ताब्यात घेतले असून पुढील कारवाईसाठी वन विभाग वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले आहे.

२६ जुलै रोजी रात्रपाळी ड्युटीवर विशेष गस्त पथक व गृहरक्षक दलाचे अंमलदार गस्त घालत होते. रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास चाळमाळा येथे जेट्टीजवळ ॲक्टिवावर (एमएच ०६ बीझेड ६३४१) राहुल हातणी संशयास्पदरित्या घिरट्या घालत होता. त्यास होमगार्ड व गस्त पथकाने थांबवून चौकशी केली तसेच संशय आल्याने अंगझडती घेऊन तपासणी केली असता स्कुटीच्या डिक्कीत एका कापडी पिशवीत व्हेल



जातीच्या संरक्षित वन्यजीव प्राण्याची उलटी मिळून आली. पंचनामा करून राहुलला ताब्यात घेण्यात आले. आरोपी व जप्त मुद्देमाल वन विभाग वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अपर अधीक्षक अभिजीत शिवथरे, उपविभागीय अधिकारी माया मोरे, अलिबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रवीण पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक उपनिरीक्षक संतोष शांताराम पाटील, हवालदार अजित देशमुख, नितेश वरसोलकर, होमगार्ड अनिल राठोड, करण नागावकर, जगदिश पवार, भालचंद्र पाटील यांनी ही कारवाई केली.

## पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेची २२ जुलै रोजीची स्थगित करण्यात आलेली महासभा सोमवारी (दि. २७) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडली. महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या महासभेत विविध विषयांवर चर्चा करून मंजुरी देण्यात आली.

मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते. त्याचप्रमाणे सर्व महापालिका सदस्य आणि अधिकारी हजर होते.

यावेळी पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती ड, प्रभाग क्र.१९मधील अं.भू.क्र.५०६ कोळीवाडा मार्केड यार्ड परिसरातील स्मशानभूमी विकसित करणे या कामाच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्याबाबत महासभेने मंजुरी दिली.

महापालिका क्षेत्रातील एलईडी पथदिवे देखभाल, दुरुस्ती तसेच नवीन एलईडी लाईट्स आणि सीसीएमएसचा पुरवठा, स्थापना आणि देखभाल दुरुस्ती (१० वर्षे)साठी राज्यस्तरावर नेमलेल्या निविदाधारक राज्यस्तरावर M/s BAC Infratech Pvt.Ltd and M/s Vinic Global PVt.Ltd (JV) या संस्थेबरोबर करारनामा करण्याकरिता सर्वसाधारण सभेची मान्यता मिळण्याबाबतचा विषय महासभेत नामंजूर करण्यात आला.

कळंबोली व नवीन पनवेल येथील विविध ठिकाणच्या उद्यानांमध्ये डेकोरेटिव्ह पथदीप खांब उभारून कार्यान्वित करण्याचा विषय मंजूर करण्यात आला. खारघर सेक्टर १२, भूखंड क्र.५८बी येथे त्याचप्रमाणे कळंबोली सेक्टर २०, भूखंड १९ आणि सेक्टर ६ ई, भूखंड ९बी येथे उद्यान विकसित करण्याचा विषय मंजूर करण्यात आला.

खारघर से. १२, अं.भू.क्र.१२ अ येथील मच्छी मार्केट (दैनिक बाजार) इमारतीचा परिसर विकसित करणे, संरक्षण भिंत बांधणे व इतर अनुषंगिक कामे करण्यास मंजुरी देण्यात आली. प्रभाग १८ पनवेल येथे स्वप्नरेखा सोसायटी ते ठाणा नाका जंक्शन येथे जुने पावसाळी गटार तोडून नवीन गटार बांधण्याचा विषय मंजूर करण्यात आला. प्रभाग क्र १४मधील एचओसी कॉलनीलगत असलेली कातकरवाडी ते जिंदाल उपटाउन एव्हेन्यू इमारतीपर्यंत आरसीसी पावसाळी गटाराचे बांधकाम करण्याचा विषय महासभेने मंजूर केला.

प्रभाग समिती अ व इतरमध्ये रस्त्यालगत असणारे गटर, पादचारी मार्गामधील इन्स्पेक्शन चेंबर्सवर वेळोवेळी आवश्यकतेनुसार सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन वर्षांकरिता झाकणे लावणे व किरकोळ दुरूस्ती करण्याचा विषय सर्व सदस्यांच्या उपसूचनांसह मंजूर करण्यात आला. महापालिका क्षेत्रातील स्मशानभूमींमध्ये पाण्याची व्यवस्था करण्याच्या विषयासही उपसूचनांसह मंजुरी देण्यात आली. मनपा क्षेत्रात नवीन पाण्याचे पंप दोन वर्षांकरिता पुरवणे आणि बसविण्याचा विषय मंजूर करण्यात आला.

कामोठे येथील ८५ द.ल.लि. क्षमतेच्या मलशुद्धिकरण केंद्रात कार्यान्वित असलेल्या ब्लोअरऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ॲक्टिव्ह मॅग्नेटिव्ह बेअरिंग व इंटिग्रेटेड आयआयओटी सिस्टमसह असलेले ब्लोअर्स पीपीपी/रेस्को डीम्ड सेव्हिंग शेअरिंग तत्त्वावर बदलणे या कामाचा अहवाल, अंदाजपत्रक व निविदा सादर करण्याकामी स्वारस्य अभिव्यक्ती (ईओआय) इत्यादी बाबी निश्चित करण्यासाठी MAHAPREIT या शासकीय संस्थेस मान्यता देणे हा विषय स्थगित करण्यात आला. मेट्रो मार्ग-१२ (कल्याण-तळोजा (अमनदूत)) मार्गाच्या अंमलबजावणीला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास पनवेल महापालिकेकडून आर्थिक सहाय्य मिळण्याकामी विनंती हा विषय महासभेत नामंजूर करण्यात आला. (पान ७ वर..)



### जलसमृद्धतेसाठी पावले

देहरंग धरणातून पनवेल शहराकरिता वाढीव पाणीपुरवठा योजना करण्याकामी प्रस्ताव जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र नागरी पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यतेकरिता शासनास सादर करण्याबाबतच्या विषयास महासभेत चर्चा करून मंजुरी देण्यात आली. त्याचप्रमाणे शिलार धरण प्रकल्पांतर्गत धरणाच्या भागभांडवली खर्चातील हिश्शाची रक्कम जलसंपदा विभागास कामाच्या प्रगतीनुसार उपलब्ध करण्याबाबतचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला.

## अलिबाग येथे नारळ फोडी स्पर्धा रंगली

### विशाल मुणगेकर विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग भंडारी भवन येथे कित्ते भंडारी हितवर्धक मंडळाच्या वतीने आयोजित 'हातावरील खेळी नारळ फोडी स्पर्धा' (पर्व १) अत्यंत चुरशीच्या, उत्साही आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. मालवण येथील विशाल मुणगेकर यांनी विजेतेपद मिळवले, तर वरसोली येथील किरण राऊत यांनी एका नारळाने १३ नारळ फोडून विक्रम केला.

स्पर्धेस उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते राजन नार्वेकर, विश्वस्त नरहरी धनाजी तथा तोडणकर गुरुजी, अध्यक्ष कमलाकर पडवळ, उपाध्यक्ष मधुकर पारकर, यशवंत राऊत, संजय राऊत, प्रसन्न खडपे, प्राजक्ता खडपे, प्रफुल्ल मोरे, सुरेश खोत, प्रशांत चिंबुलकर, तुकाराम शिलधनकर, संतोष मोरे, राजन वाडकर, साहिल रमेश पाटील, शैलेश



चव्हाण, मनोहर कासेकर, दिलीप मुकादम, दीपक मयेकर, दीपक आंबुकर, संतोष कीर, जनार्दन राऊत, सुरेश खडपे, अमोल मयेकर, राजेंद्र बांदिवडेकर, भारत रांजणकर, प्रथमेश नार्वेकर, प्रफुल्ल नागवेकर, शैलेश राऊत, सचिन खेऊर आदी उपस्थित होते.

प्रथम क्रमांक विशाल मुणगेकर (मालवण, सिंधुदुर्ग), द्वितीय किरण राऊत (वरसोली, अलिबाग), तृतीय दीप केरकर (मालवण), चतुर्थ गजानन दामोदर मोरे (अलिबाग), उत्कृष्ट नारळ किरण राऊत (वरसोली, अलिबाग), उत्कृष्ट फटकेबाज मनोज मयेकर (नागाव, अलिबाग), शिस्तबद्ध संघ संतोष हळदणकर (मालवण) अशी बक्षिसे देण्यात आली.

## माळशेज घाटात रस्ता खचून वाहतूक बंद

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात मुसळधार पावसामुळे कल्याण-माळशेज घाट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१वर करंजाळे गावाच्या हद्दीत रस्ता खचल्याची घटना घडली. संभाव्य धोका टाळण्यासाठी माळशेज घाटातील वाहतूक पूर्णपणे बंद करण्यात आली आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी माळशेज घाटातील सर्व प्रकारच्या वाहनांची वाहतूक पुढील आदेशापर्यंत पूर्णपणे बंद करण्याचे आदेश जारी केले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, सातारा-महाबळेश्वर मार्गावरील केळघर घाटात महाकाय दरड कोसळली. त्यामुळे वाहतूक ठप्प होऊन वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.

## उप विभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल यांजकडून

क्रमांक आयडीसी २०२६/(प्र.क्र.२७४)/उ-१४, महोदर, चिंचवली व चिंध्रण, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड, ज्याअर्थी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा तीन) चे कलम १ पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार -ब दिनांक १२ जून २०२६ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेली दिनांक १२ जून २०२६ ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आय.डी.सी. २०२६ / (२७४) उद्योग - १४, अन्वये, उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे, त्या अधिसूचनेच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात सन २०२६ च्या जुन महिन्यांच्या १३ व्या दिवसापासून अंमलात येतील असा महाराष्ट्र शासनाने निर्देश दिला आहे.

आणि ज्याअर्थी, यामधील अनुसूचीत वर्णन केलेल्या जमिनी उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत अशा क्षेत्रात आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांना लागू करण्यात आले आहे अशा क्षेत्रात असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यात यानंतर ज्याचा उक्त महामंडळ असा निर्देश करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्ट्यर्थ असेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ, आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये राज्य शासनास प्रदान करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (ग) अन्वये काढण्यात आलेली दिनांक १२ जून २०२६ ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग आय.डी.सी. २०२६/(२७४) उद्योग-१४, च्या द्वारे, राज्य शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यांच्या नियम २८ अन्वये जिल्हाधिकाऱ्यांकडे जी कामे सोपविण्यात आली आहेत अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३, पोट-कलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल, जि. रायगड यांची विशेषरीत्या नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र / औद्योगिक वसाहत म्हणून विकसित करण्यासाठी किंवा दोन्हीकरिता म्हणून सोबतच्या अनुसूचीत वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत असे उप विभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल, जि. रायगड चे मत झालेले आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम ३२, पोट-कलम (२) व उक्त अधिसूचना याखालील राज्य शासनाच्या शक्तीचा वापर करून, मी, पवन चांडक, उप विभागीय अधिकारी, पनवेल विभाग, पनवेल, जि. रायगड याद्वारे यामध्ये वर्णन केलेल्या जमिनी उक्त प्रयोजनार्थ का संपादन करण्यात येऊ नयेत यासंबंधी दिनांक १४ ऑगस्ट २०२६ पूर्वी खालील सही करणाऱ्यास लेखी स्वरूपात कारण दर्शविण्याबद्दल आपणास फर्माविण्यात येत आहे.

या नोटिशीच्या तारखेनंतर, मा. जिल्हाधिकारी यांच्या मंजुरी शिवाय, विक्री करून, पट्ट्याने देऊन गहाण देऊन, अभिहस्तांतरण करून, अदलाबदल करून किंवा अन्य रीतीने, करावयाच्या उक्त जमिनीच्या विल्हेवाटीसाठी केलेला कोणताही करार किंवा त्यावर केलेला कोणताही खर्च किंवा त्यामध्ये केलेल्या सुधारणा या उक्त जमिनीच्या अंतिमतः संपादन करण्यात येतील अशा भागांसंबंधी भरपाई निर्धारित करणाऱ्या अधिकाऱ्याकडून, अधिनियमाचे कलम ३३, पोट-कलम (५) व भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) याच्या कलम २४ (सातव्यांदा) अन्वये विचारात घेतल्या जाणार नाहीत.

ज्यांची व्यक्तिगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्यांचे आत, भेटीची वेळ ठरवून, कोणत्याही दिवशी, सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत खाली सही करणा-यापुढे जातीने किवा कायदेशीर मुख्यत्यारामार्फत हजर राहता येईल.

**मौजे-महोदर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| अ.क्र. | स.नं./गट नं. | हि.नं. | एकूण (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | ३७ | १/अ | ०.१५७० |
| २ | ३७ | २ | ०.०६१० |
| ३ | ३८ | ० | ०.६९६० |
| ४ | ३९ | १/अ | ०.२३८० |
| ५ | ३९ | १/ब | ०.२६०० |
| ६ | ३९ | १/क | ०.२००० |
| ७ | ४० | ० | ०.१६५० |
| ८ | ४१ | ० | ०.३३१० |
| ९ | ४२ | १ | ०.४७२० |
| १० | ४२ | २ | ०.१७७० |
| ११ | ४२ | ३ | ०.१७७० |
| १२ | ४२ | ४ | ०.१६७० |
| १३ | ४२ | ५ | ०.३७२० |
| १४ | ४२ | ६ | ०.०६१० |
| १५ | ४३ | ० | ०.३८४० |
| १६ | ४४ | ० | ०.३६४० |
| १७ | ४५ | ० | ०.२०७० |
| १८ | ४६ | ० | ०.३४१० |
| १९ | ४७ | ० | ०.४८८० |
| २० | ४८ | १ | ०.२०७० |
| २१ | ४८ | २ | ०.६००० |
| २२ | ४९ | पै. | १.४२०० |
| २३ | ५० | २ | ०.४७५० |
| २४ | ५० | ३/अ | ०.१८०० |
| २५ | ५० | ३/ब | ०.५७५० |
| २६ | ५० | ४ | ०.६३०० |
| २७ | ५० | ५ | ०.१४९० |
| २८ | ५१ | ० | ०.८९७० |
| २९ | ५२ | १ | ०.३५९० |
| ३० | ५२ | २/अ | ०.९४३० |
| ३१ | ५२ | २/क | ०.८४०० |
| ३२ | ५२ | २/ब | ०.८४०० |
| ३३ | ५३ | ० | ०.२७८० |
| ३४ | ५४ | १ | ०.१७२० |
| ३५ | ५४ | २ | ०.१८२० |
| ३६ | ५४ | ३ | ०.१११० |
| ३७ | ५८ | ० | ०.७६०० |
| ३८ | ६३ | १ पै. | ०.७००० |
| ३९ | ६३ | २/अ पै. | ४.५०४० |
| ४० | ६३ | २/ब पै. | |
| ४१ | ६३ | २/क | |
| ४२ | ६४ | ० | ०.६४०२ |
| ४३ | ६९ | ० पै | ०.८५०० |
| ४४ | ९५ | १ | १.१००० |
| ४५ | ९५ | २ | ०.११२० |
| ४६ | ७८ | १ | ०.००९४ |
| ४७ | ७८ | २ | ०.३०७५ |
| ४८ | ७८ | ३ | ०.१५०५ |
| ४९ | ७९ | ० | ०.६६७८ |
| ५० | ८० | ० | ०.६९३० |
| ५१ | ८१ | पै. | ०.६००० |
| ५२ | ९६ | १ | ०.३८२९ |
| ५३ | ९६ | २ | ०.०७०७ |
| ५४ | ९६ | ३ | ०.५०२७ |
| ५५ | ९७ | १ | ०.१६९८ |
| ५६ | ९९ | १/अ | ०.३३५३ |
| ५७ | ९९ | २/अ | ०.०२५७ |
| ५८ | ९९ | २/ब | ०.०४०० |
| ५९ | १०० | १/अ | ०.२८०० |
| ६० | १०० | १/ब | ०.४२६० |
| ६१ | १०१ | १ | ०.०९५४ |
| ६२ | १०१ | २ | ०.१४०५ |
| ६३ | १०२ | १ पै. | १.५८२८ |
| ६४ | १०३ | १ | ०.०९४० |
| ६५ | १०३ | २ | ०.५९१० |
| ६६ | १०८ | ० | ०.२८०० |
| ६७ | १०९ | ० | ०.१४०० |
| ६८ | ११० | ० | ०.३३१० |
| ६९ | १११ | ० | १.५७३० |
| ७० | ११२ | १ | ०.६६७० |
| ७१ | ११२ | २ | ०.३६७० |
| ७२ | ११३ | ० | ०.४५३० |
| ७३ | ११४ | १ | ०.१०४० |
| ७४ | ११४ | २ | १.७९०० |
| ७५ | ११५ | १ | ०.२८१० |
| ७६ | ११५ | २ | ०.२१७० |
| ७७ | ११६ | ० | ०.६२२० |
| ७८ | ११७ | १ | ०.४९३० |
| ७९ | ११७ | २ | ०.३५२० |
| ८० | ११८ | १ | २.७७०० |
| ८१ | ११८ | २ | ०.१३०० |
| ८२ | ११९ | १ | ०.४९६० |
| ८३ | ११९ | २/अ | ०.८४५० |
| ८४ | ११९ | २/ब | ०.४००० |
| ८५ | ११९ | ३ | ०.५९७० |
| ८६ | ११९ | ४ | ०.१२६० |
| ८७ | ११९ | ५ | ०.२२५० |
| ८८ | १२० | ० | ०.४६५० |
| ८९ | १२१ | ० | ०.४९३० |
| ९० | १२२ | ० | ०.१९०० |
| ९१ | १२३ | ० | ०.७५४० |
| ९२ | १२४ | १ | ०.१६७० |
| ९३ | १२४ | २ | ०.५४६० |
| ९४ | १२५ | ० | ०.४३०० |
| ९५ | १२६ | ० | ०.३६०० |
| ९६ | १२७ | ० | ०.१८७० |
| ९७ | १२८ | ० | ०.४५०० |
| ९८ | १२९ | ० | ०.२२०० |
| ९९ | १३० | १ | ०.१४२० |
| १०० | १३० | २ | ०.५७४० |
| १०१ | १३० | ३ | ०.०९३० |
| १०२ | १३१ | १ | ०.१५९० |
| १०३ | १३१ | २ | ०.०६३० |
| १०४ | १३१ | ३ | ०.१९०० |
| १०५ | १३२ | ० | ०.३३४० |
| १०६ | १३३ | १ | ०.४८८० |
| १०७ | १३३ | २ | २.१७९० |
| १०८ | १३३ | ३ | ०.१६२० |
| १०९ | १३३ | ४ | ०.०४५० |
| ११० | १३३ | ५ | ०.०४०० |
| १११ | १३३ | ६ | ०.१७७० |
| ११२ | १३४ | ० | ०.४२७० |
| ११३ | १३५ | ० | ०.४२७० |
| ११४ | १३६ | ० | ०.५६०० |
| ११५ | १३७ | ० | १.२२०० |
| ११६ | १३८ | ० | ०.२२८० |
| ११७ | १३९ | ० | ०.१५२० |
| ११८ | १४१ | १ | ०.२३५० |
| ११९ | १४१ | २ | ०.१५४० |
| १२० | १४१ | ३ | ०.०८३० |
| १२१ | १४१ | ४ | १.३०८० |
| १२२ | १४१ | ५ अ | ०.४६८० |
| १२३ | १४१ | ५ ब | ०.७८९० |
| १२४ | १४१ | ६ | ०.४१५० |
| १२५ | १४२ | १ अ | ०.३०५० |
| १२६ | १४२ | २ अ | ०.३०४० |
| १२७ | १४२ | ब | ०.६१०० |
| १२८ | १४३ | ० | ०.५१६० |
| १२९ | १४४ | ० | १.४९७० |
| १३० | १४५ | ० | ०.६८०० |
| १३१ | १४६ | १ | ०.४२०० |
| १३२ | १४६ | २ | ०.३६९० |
| १३३ | १४७ | १/अ | ०.३०६० |
| १३४ | १४७ | १/ब | ०.३२६० |
| १३५ | १४७ | २ | ०.४९६० |
| १३६ | १४७ | ३ | ०.२५३० |
| १३७ | १४७ | ५ | ०.२३३० |
| १३८ | १४७ | ६ | ०.९६९० |
| १३९ | १४७ | ७ | ०.३३४० |
| १४० | १४७ | ८/अ | ०.५२३० |
| १४१ | १४७ | ८/क | ०.६४०० |
| १४२ | १४७ | ८/ब/१ | १.२७९० |
| १४३ | १४७ | ८/ब/२ | ०.४००० |
| १४४ | १४७ | ९ | ०.१७२० |
| १४५ | १४८ | ० | १.६१६० |
| १४६ | १४९ | १ | ०.१५२० |
| १४७ | १४९ | २ | ०.१६२० |
| १४८ | १४९ | ३ | ०.४९६० |
| १४९ | १४९ | ४ | ०.३०३० |
| १५० | १४९ | ५ | ०.४२५० |
| १५१ | १५० | ० | ०.५१०० |
| १५२ | १५२ | ० | ०.४३०० |
| १५३ | १५३ | ० | ०.६२०० |
| १५४ | १५४ | १ | ०.१९७० |
| १५५ | १५४ | २ | ०.३१३० |
| १५६ | १५५ | १ | ०.६३७० |
| १५७ | १५५ | २ | ०.५४४० |
| १५८ | १५५ | ३ | ०.२४०० |
| १५९ | १५५ | ४ | ०.०५१० |
| १६० | १५६ | ० | ०.१६४० |
| १६१ | १५७ | १/अ | ०.८५२० |
| १६२ | १५७ | १/ब | १.०००० |
| १६३ | १५७ | २/अ | ०.५७४० |
| १६४ | १५७ | २/ब | ०.५६१० |
| १६५ | १५८ | १ | ०.४४०० |
| १६६ | १५८ | २/अ | ०.१८७० |
| १६७ | १५८ | २/ब | ०.१८७० |
| १६८ | १५९ | ० | ०.५२०० |
| १६९ | १६० | १ | ०.९६६० |
| १७० | १६० | २ | ०.०७३० |
| १७१ | १६० | ३ | ०.६०४० |
| १७२ | १६० | ४ | ०.१८२० |
| १७३ | १६० | ५ | १.०६६० |
| १७४ | १६० | ६ | ०.४७३० |
| १७५ | १६० | ७/अ | ०.५२६० |
| १७६ | १६० | ७/ब | ०.३५४० |
| १७७ | १६० | ७/क | ०.३०३० |
| १७८ | १६० | ८ | ०.१८२० |
| १७९ | १६० | ९ | ०.३९५० |
| १८० | १६१ | ० | ०.४८८० |
| १८१ | १६२ | ० | ०.८५०० |
| १८२ | १६३ | १ | ०.४६३० |
| १८३ | १६३ | २ | ०.४३७० |
| १८४ | १६४ | ० | ०.६५८० |
| १८५ | १६५ | १/अ | ०.६८४० |
| १८६ | १६५ | १/ब | ०.३२४० |
| १८७ | १६५ | ३ | ०.३१४० |
| १८८ | १६५ | ६ | ०.६५३० |
| १८९ | १६५ | ७/अ | ०.३२४० |
| १९० | १६५ | ७/ब | ०.५०६० |
| १९१ | १६५ | ८ | ०.३०३० |
| १९२ | १६५ | ९ | ०.७४३० |
| १९३ | १६५ | १० | ०.३२४० |
| १९४ | १६५ | ११ | ०.३७४० |
| १९५ | १६५ | १२ | ०.७७४० |
| १९६ | १६६ | ० | ०.१५०० |
| १९७ | १६७ | ० | ०.३५२० |
| १९८ | १६८ | १ | ०.८१४० |
| १९९ | १६८ | २ | ०.४९६० |
| २०० | १६८ | ३ | ०.१८२० |
| २०१ | १७० | ० | ०.३५२० |
| २०२ | १७१ | ० | ०.४९८० |
| २०३ | १७२ | ० | ०.५७०० |
| २०४ | १७३ | १ | ०.७४८० |
| २०५ | १७३ | २ | ०.०१३० |
| २०६ | १७४ | ० पै. | ६.५००० |
| २०७ | १७५ | ० | ०.२३०० |
| २०८ | १७६ | ० | ०.५९७० |
| २०९ | १७७ | ० | ०.३६९० |
| २१० | १७८ | ० | १.१६०० |
| २११ | १७९ | १ | ०.१६२० |
| २१२ | १७९ | २ | १.३७६० |
| २१३ | १७९ | ३ | ०.३५४० |
| २१४ | १७९ | ४ | ०.१९०० |
| २१५ | १७९ | ५ | ०.०७८० |
| २१६ | १८० | १/अ | ०.३१५० |
| २१७ | १८० | १/ब | ०.२०२० |
| २१८ | १८० | २ | ०.१४४० |
| २१९ | १८० | ३ | ०.१३१० |
| २२० | १८१ | ० | ०.९१३०pp |
| २२१ | १८२ | ० | ०.३४९० |
| २२२ | १८३ | ० | ०.८४२० |
| २२३ | १८४ | १ | ०.१०४० |
| २२४ | १८४ | २ | ०.३५४० |
| २२५ | १८५ | १ | ०.२९१० |
| २२६ | १८५ | २ | ०.६५०० |
| २२७ | १८५ | ३ | ०.४३२० |
| २२८ | १८६ | ० | ०.१९२० |
| २२९ | १८७ | ० | ०.५५०० |
| २३० | १८८ | १ | ०.४५५० |
| २३१ | १८८ | २ | ०.३१९० |

पान ५ वर..

# पनवेलच्या डॉक्टरांची पंढरीत आरोग्यसेवा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील डॉक्टरांची एक प्रगतशील संघटना पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन यांच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष डॉ. वैभव मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्याची वारी पंढरीच्या दारी, हे घोषवाक्य घेऊन आषाढी एकादशीचे औचित्य साधून पंढरपूर येथे वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत औषध वाटपाचा कार्यक्रम पार पडला. पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टीस्टर असोसिएशनचे हे चौथे वर्ष असून यामधून डॉक्टर्सना खूप मोठे मानसिक समाधान मिळत असल्याचे पाहावयास मिळत आहे.



पनवेलमधील डॉक्टरांना स्वतःच्या व्यवसायाचा ताण कमी करण्यासाठी पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनच्या वतीने या वारीची सुरुवात पनवेलमधील सुप्रसिद्ध डॉक्टर गिरीश गुणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली. प्रथमतः प्रति बालाजी नारायणपूर येथे नारायण महाराजांचे दर्शन आणि सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण रामा पाटील यांच्या वतीने प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. जेजुरी येथे खंडोबारायाचे दर्शन, त्यानंतर मोरगावच्या गणपतीचे दर्शन घेऊन ही सर्व डॉक्टर मंडळी अकलूज येथे डॉक्टर विवेक देवकाते यांच्या घरी मुक्कामाला थांबली होती.

२५ जुलैला सकाळी पंढरपूर येथे रायगड वारकरी भवन या ठिकाणी ह. भ. प. गणेश महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी भवनामध्ये वारकऱ्यांसाठी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मोफत तपासणी आणि मोफत औषधोपचार अशी सेवा करण्यात आली. सलग चौथ्या वर्षी करण्यात आलेल्या या वारीचे यशस्वी आयोजन पनवेल डॉक्टर्स जनरल प्रॅक्टिशनर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. वैभव मोकल, उपाध्यक्ष डॉ. वैष्णवी नाईक, सहखजिनदार डॉ. सुदर्शन मेटकर, डॉ. वैभव पाटील, डॉ. स्वप्नील लोखंडे, डॉ. आशिष गांधी, डॉ. नरेश पाटील, डॉ. राजेश गांधी, डॉ. रसिका पाटील, डॉ. स्वप्नील बाविस्कर, डॉ. अमित दवे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेऊन ही वारी यशस्वी केली.

## पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षदिंडी, वृक्षारोपण

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्राच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त व संस्थेचे अध्यक्ष उत्तम शिंदे यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल वसुंधरा समृद्धी फाउंडेशनच्या वतीने कळंबोली येथे पर्यावरण जनजागृतीसाठी वृक्षदिंडी काढून गणेश विसर्जन तलाव परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

या सामाजिक उपक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष तथा सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक उत्तम शिंदे यांनी केले होते. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मोठ्या उत्साहात वृक्षदिंडी काढण्यात आली. त्यानंतर गणेश विसर्जन तलावाजवळ विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करून



पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेण्यात आली.

कार्यक्रमास उपमहापौर प्रमिला पाटील, नगरसेवक रामदास शेवाळे, नगरसेविका बायजा बारगजे, मोनिका महानवर, सरस्वती काथारा, भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, भाजप भटके विमुक्त मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, कळंबोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर, संत सावता माळी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष नितीन जाधव, समाजसेवक लहूशेठ मलकमीर तसेच पदाधिकारी सुनील रासकर, शशिकांत गोरे यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पर्यावरणाचे संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून अधिकाधिक वृक्ष लागवड व त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प प्रत्येक नागरिकाने करावा, असे आवाहन केले. या उपक्रमामुळे परिसरात पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास मोठी मदत झाली.



## ईट प्ले रीड, दोस्त मुंबई संस्थांची प्रेरणादायी भेट

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त धन्वंतरीज ऑर्गनायझेशन फॉर सोशिओ हेल्थ ट्रान्सफॉर्मेशन 'दोस्त मुंबई' आणि 'ईट प्ले रीड' या दोन समाजाभिमुख संस्थांमध्ये एक प्रेरणादायी भेट घडली. 'दोस्त मुंबई' संस्थेचे संस्थापक डॉ. कैलाश जवादे, अध्यक्ष डॉ. वैशाली जवादे आणि जनसंपर्क अधिकारी श्रीकांत गावित हे गेल्या २४ वर्षांपासून ग्रामीण आणि शहरी भागात अवयवदान, आरोग्य सेवा आणि सामाजिक जनजागृतीसाठी कार्यरत आहेत.

मागील १२ वर्षांपासून संस्था पंढरपूर वारीत अवयवदान व आरोग्य सेवा दिंडी काढत आहे. यंदाच्या वारी दिंडीदरम्यान 'ईट प्ले रीड' संस्थेच्या संस्थापक अपर्णा शहा यांच्याशी विशेष भेट झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली 'ईट प्ले रीड'चे राजदूत या दिंडीत सहभागी झाले. त्यांनी "खा, खेळा, वाचा" या घोषवाक्याद्वारे समाजात वाचन, आरोग्य आणि आनंददायी जीवनशैलीचा संदेश दिला.

अपर्णा शहा यांच्या पुढाकारातून आणि 'दोस्त मुंबई'च्या सहकार्याने राबवलेल्या या जनजागृती उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'ईट प्ले रीड'चा हा उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवण्याची दिशा दाखवतो. या भेटीमुळे भविष्यात दोन्ही संस्थांच्या संयुक्त उपक्रमांद्वारे सामाजिक एकात्मता आणि जनहितकारी योजना राबवण्याची शक्यता अधिक बळकट झाली आहे.

## एमएनएम विद्यालयात कारगिल विजय दिवस उत्साहात

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या एमएनएम व टीएनजी कनिष्ठ विज्ञान विद्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त विविध देशभक्तिपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि भारतीय सैनिकांप्रति कृतज्ञतेची भावना जागृत करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात विशेष सभेने झाली. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी कारगिल विजय दिवसाचे महत्त्व सांगणारी प्रभावी भाषणे सादर केली तसेच देशभक्तिपर समूहगीत आणि आकर्षक नृत्याविष्काराद्वारे उपस्थितांची मने जिंकली. यानंतर इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी पत्रलेखन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्राच्या संरक्षणासाठी धन्यवाद, आमच्या शूर सैनिकांना एक पत्र आणि आम्हाला तुमचा अभिमान आहे, या विषयांपैकी एका




विषयावर विद्यार्थ्यांनी भारतीय सैनिकांप्रति कृतज्ञता, आदर आणि अभिमान व्यक्त करणारी भावपूर्ण पत्रे लिहिली.

सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पहिल्याच तासात हा उपक्रम पूर्ण केला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये भारतीय सैन्याविषयी आदर, देशभक्तीची भावना आणि राष्ट्रसेवेचे महत्त्व अधिक दृढ झाले. आयोजनासाठी विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षक, पर्यवेक्षिका यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

## रामशेठ ठाकूर विद्यालयात कारगिल विजय दिनानिमित्त शौर्याला अभिवादन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शनिवारी (दि. २५) कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. भारतीय सैन्याच्या शौर्य, पराक्रम व सर्वोच्च बलिदानाला अभिवादन करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून झाली. यावेळी विद्यार्थ्यांना कारगिल युद्धातील भारतीय सैनिकांच्या अद्वितीय शौर्याची माहिती देण्यात आली. देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि कर्तव्य भावनेचे महत्त्व अधोरेखित करणारे प्रेरणादायी विचार मांडण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी देशभक्तीपर गीतांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांद्वारे सैनिकांना मानवंदना अर्पण केली. कार्यक्रम प्राचार्या निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

## 'रोटरी'कडून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**रसायनी : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा व डॉ. धीरज जैन परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लाडीवली कातकरवाडी, महिला उद्योग मंडळ शाळा पराडे तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चावणे येथील १३४ गरजू विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमासाठी रो. डॉ. धीरज जैन व अमित शाह यांचे विशेष सहकार्य लाभले.



कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष देवेंद्र महिंद्रकर, सचिव नागेश कदम, सर्व्हिस प्रोजेक्ट चेअरमन गणेश काळे, खजिनदार अमित शाह, शशिकांत शानबाग, धीरज जैन, डॉ. प्रतिभा महिंद्रकर, डॉ. स्विटी जैन यांच्यासह रोटरी सदस्य उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. या सामाजिक उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व रोटरी सदस्य, स्वयंसेवक आणि हितचिंतकांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.

## सखा पांडुरंग ऑनलाइन अभंग स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीचे औचित्य साधून मानसी सामाजिक संस्था आणि एस नॅपकिन बुकेज सत्कार हाऊस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "सखा पांडुरंग" ऑनलाइन अभंग गायन स्पर्धेला विद्यार्थी, पालक आणि शाळांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभिनव उपक्रमात विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी पांडुरंगावरील अभंग सादर करून भक्ती, संस्कार आणि मराठी सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविले.

मोरू नारायण म्हात्रे विद्यालय उलवे, महात्मा स्कूल खांदा कॉलनी, श्री सुविद्या विद्यालय कामोठे, महात्मा स्कूल ऑफ अकॅडमी पनवेल, भागूबाई ठाकूर स्कूल उरण, वेस्टर्न हिल्स हायस्कूल कामोठे, ज्ञानवर्धिनी स्कूल शिरवळ यांच्यासह अनेक शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत अथर्व जीवबा पोवार, याद्नी अनिल महाडिक, वैष्णवी नानासाहेब दुधाळ, उत्कर्षा तळेकर, चंदन भगत, ओंकार मंगेश महाडिक यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी सुरेल अभंग सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांना ऑनलाइन ई-प्रमाणपत्र देण्यात आले तसेच लकी ड्रॉद्वारे निवड झालेल्या पाच विद्यार्थ्यांना भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांची आकर्षक मूर्ती भेट देण्यात येणार आहे. या उपक्रमामागील उद्देश विद्यार्थ्यांमध्ये भक्तीभाव, संस्कार आणि मराठी अभंग परंपरेची आवड निर्माण करणे हा आहे, असे मानसी सामाजिक संस्थेचे संस्थापक डॉ. गोरखनाथ पोळ यांनी सांगितले.

एस नॅपकिन बुकेज सत्कार हाऊसच्या प्रोप्रायटर सविता गोरखनाथ पोळ यांनी सर्व सहभागी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शाळांचे आभार मानले. भविष्यातही असे सांस्कृतिक उपक्रम राबवले जातील, असे त्या म्हणाल्या. या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून समाजाच्या विविध स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

## नफ्याच्या आमिषाने ज्येष्ठ नागरिकाला ६५ लाखांचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

शेअर बाजारात मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर भामट्यांनी खारघरमधील ७३ वर्षीय निवृत्त जनरल मॅनेजरला ६५ लाख १९ हजार रुपयांचा गंडा घातला. याप्रकरणी नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खारघर सेक्टर-२१ येथील रहिवासी असलेल्या ज्येष्ठाला 'अपस्टॉक' कंपनीच्या नावाने बनावट व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये जोडण्यात आले होते. या ग्रुपमध्ये आदिती वर्मा, काव्या चतुर्वेदी आणि इतर संशयितांनी नफ्याचे खोटे स्क्रीनशॉट्स दाखवून त्यांना गुंतवणुकीसाठी प्रवृत्त केले. आरोपींनी बनावट अ‍ॅपद्वारे रजिस्ट्रेशन करायला लावून विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने ६५ लाख १९ हजार रुपये जमा करण्यास भाग पाडले. अ‍ॅपवर मोठा नफा दिसू लागल्याने ज्येष्ठाने पैसे काढण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी आणखी २७ लाख रुपयांची मागणी केली.

पैसे न भरल्यास खाते फ्रीज करण्याची धमकीही दिली. यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने नवी मुंबई सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून बँक खाती, मोबाइल क्रमांक आणि अ‍ॅपचा तपास सुरू केला आहे.

## ज्येष्ठ नागरिकाची ५.२८ लाखांची ऑनलाइन फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

महानगर गॅस लिमिटेड कंपनीच्या नावाने बनावट मेसेज पाठवून सायबर भामट्यांनी खांदा कॉलनीतील ज्येष्ठ नागरिकाला ५ लाख २८ हजार ३६४ रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर टोळीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार खांदा कॉलनीत राहणारे सुभाष बाबाराव तारे (७०) यांच्या मोबाइलवर "Dear Pipeline MGL Gas User" असा मेसेज आला. त्यात मागील महिन्याचे मीटर रीडिंग अपडेट झाले नसल्याचे सांगून रात्री ९.३० वाजता गॅस कनेक्शन बंद करण्यात येईल, अशी भीती दाखवण्यात आली. संदेशात "बिल अपडेट ऑफिसर" म्हणून एका व्यक्तीचा मोबाइल क्रमांकही देण्यात आला होता. संदेश खरा असल्याचे मानून तारे यांनी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधला. समोरच्या व्यक्तीने बिल अपडेटसाठी फक्त १३ रुपये भरण्यास सांगितले. व्यवहारादरम्यान तारे यांना संशय आल्याने त्यांनी प्रक्रिया थांबवली आणि फोन बंद केला, मात्र तोपर्यंत सायबर भामट्यांनी त्यांच्या बँक खात्यात प्रवेश मिळवून ५,२८,३६४ रुपये काढून घेतले होते.

खाते पडताळणीनंतर फसवणूक झाल्याचे समोर आले. तारे यांनी तातडीने १९३० सायबर हेल्पलाइनवर तक्रार नोंदवली. त्यानंतर खांदेश्वर पोलिसांत लेखी तक्रार दिली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## फुंडे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची भक्तिमय वारी उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्र विठ्ठलनामाच्या जयघोषात रंगून गेला असताना फुंडे विद्यालयाचे विद्यार्थीदेखील वारकरी दिंडीत रममाण झाले. रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक विद्यालय फुंडे येथील विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी व वृक्षदिंडी नवघर गावातील विठ्ठल-रुख्मिणीच्या मंदिरात काढण्यात आली होती.



विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, वरिष्ठ लेखनिक नितीन म्हात्रे, नवनित ठाकूर आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते विठूरायाच्या पालखीचे पूजन करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षक एस.डी. म्हात्रे, आर.जी. शेळके, एच.एन. पाटील, एस.डी.नाईक, पी. ए. पाटील व सर्व सेवक आणि विद्यार्थी यांनी आरती म्हटली. श्रेया खामकर व सहकारी तसेच रुद्रा धुमाळ व सहकारी यांनी विठ्ठलभक्तीच्या गीतावर अप्रतिम नृत्य सादर केले.

गुरुकुल विभाग प्रमुख ए. आर. म्हात्रे यांनी बसवलेल्या लेझीम पथकानेही उत्तम सादरीकरण केले. इयत्ता दहावी ब च्या वर्गाचे वर्गशिक्षक एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची तयारी केली होती. त्यानंतर टाळ, मृदंग, विठ्ठलनामाचा जयघोष आणि लेझीमच्या तालावर विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी व वृक्षदिंडीने नवघर गावाकडे प्रस्थान केले. ग्रामस्थांनी पालखीचे मनोभावे दर्शन घेतले. हभप रायगडभूषण प्रभाकर महाराज, प्रणय कडू, स्कूल कमिटी सदस्य विश्वास तांडेल यांच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार वाटप करण्यात आला.

यावेळी संदीप तांडेल, भूपेंद्र पाटील, रमेश तांडेल, हर्षद तांडेल उपस्थित होते. दिंडी यशस्वी होण्यासाठी उरण वाहतूक शाखा आणि उरण पोलीस स्टेशन या दोन्ही पोलीस अधिकारीवर्गाचे उत्तम सहकार्य लाभले.

## संपादकीय

# जनहित की राजकारण?

संसदेच्या सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात विरोधकांच्या सततच्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज वारंवार तहकूब होत आहे. यामुळे देशासमोरील महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होण्याऐवजी संसदेचा मौल्यवान वेळ वाया जातो. सोमवारीही विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे दिवसभरात लोकसभेचे कामकाज चार वेळा तहकूब करण्यात आले.

**पेपरफुटीच्या घटनांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने सार्वजनिक परीक्षा विधेयक, २०२६ (पब्लिक एक्झामिनेशन्स बिल २०२६) सोमवारी लोकसभेत सादर केले. नीट पेपरफुटी प्रकरणीचा वाद आणि संबंधित विद्यार्थी आंदोलनानंतर परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढवण्याच्या आणि पेपरफुटीच्या घटनांवर कठोर कारवाईच्या उद्देशाने हे विधेयक महत्त्वाचे मानले जात आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या संदेशात परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि विश्वासार्ह करण्यासाठी उच्चस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्याची घोषणा केली. तसेच पेपरफुटी रोखण्यासाठी अधिक कठोर कायदेशीर उपाययोजनेचाही निर्धार व्यक्त केला. त्यामुळे देशभरातील विद्यार्थी, पालक आणि अवघ्या शिक्षण क्षेत्राचे लक्ष या विधेयकाकडे लागले आहे. अशा परिस्थितीत संसदेत या सुधारणांवर सविस्तर चर्चा होणे अपेक्षित असताना विरोधकांनी सभागृहातील गोंधळ कायम ठेवणे हे दुर्दैवीच म्हणावे लागेल. सोमवारी लोकसभेत जेव्हा जेव्हा कामकाज पुन्हा सुरू झाले, तेव्हा तेव्हा काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या खासदारांनी घोषणाबाजी केली. या गदारोळामुळे दिवसभरात लोकसभेचे कामकाज चार वेळा तहकूब करण्यात आले. परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर विरोधकांनी सरकारला धारेवर धरणे हा त्यांचा लोकशाहीतील अधिकार आहे. मात्र या विषयावर चर्चा करण्याऐवजी सभागृहाचे कामकाजच ठप्प करण्याची भूमिका कितपत योग्य आहे? सरकारने या विषयावर चर्चा करण्याची तयारी दर्शविली असतानाही विरोधकांनी घोषणाबाजी आणि गोंधळाचा मार्ग स्वीकारल्याने अनेक दिवसांचा कामकाजाचा वेळ वाया गेला आहे. संसदेबाहेरही विरोधी पक्षांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनांना पाठिंबा देत विविध ठिकाणी निदर्शने केली. आंदोलन करणे हा लोकशाहीतील अधिकार असला तरी त्याच मुद्यावर विरोधकांनी संसदेत विधायक चर्चा न होऊ देणे हा विरोधाभास खटकतोच. सरकारला प्रश्न विचारण्यासाठी संसदेसारखे प्रभावी व्यासपीठ दुसरे नाही. लोकशाही व्यवस्थेत संसद हे केवळ कायदे करण्याचे व्यासपीठ नसून सरकारला जाब विचारण्याचे, पर्यायी विचार मांडण्याचे आणि जनतेच्या प्रश्नांवर विधायक चर्चा घडवून आणण्याचे सर्वोच्च व्यासपीठ आहे. घोषणाबाजीपेक्षा तथ्यांवर आधारित चर्चा सरकारलाही उत्तर देण्यास भाग पाडू शकते आणि जनतेलाही त्यातून सत्य समजू शकते. संसदेचे कामकाज करदात्यांच्या पैशातूनच चालते. ते ठप्प झाल्यामुळे कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक निधी वाया जातो. सततच्या गदारोळामुळे महत्त्वाची विधेयके, विकासाशी संबंधित धोरणे आणि विविध मंत्रालयांच्या कामकाजावरील चर्चा पुढे ढकलली जाते. याचा फटका अखेरीस नागरिकांनाच बसतो हे विरोधकांच्या लक्षात का येत नाही? देशाचा कारभार उत्तम चालण्यासाठी व सुदृढ लोकशाहीसाठी सक्षम सरकार जितके आवश्यक आहे, तितकाच विरोधीपक्षही जबाबदार असावा लागतो. सरकारच्या निर्णयांवर कठोर टीका करणे, पर्यायी धोरणे मांडणे आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे हे विरोधकांचे कर्तव्य आहे. संसदेचे कामकाज ठप्प करून राजकीय संदेश देण्याची विरोधकांची पद्धत लोकशाहीला बळकट करत नाही. भारत आज जगातील वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. अशा वेळी संसदेतील प्रत्येक दिवस विकास, सुधारणा आणि जनहितासाठी उपयोगात आणला जाणे आवश्यक आहे.**

# प्लास्टिक एक सोय, पण जीवनापेक्षा महत्त्वाचे नाही!

निसर्ग आणि सजीवसृष्टी हे एकमेकांचे पूरक आहेत. मानवाने आपल्या बुद्धिमत्तेच्या, संशोधनाच्या आणि तांत्रिक प्रगतीच्या बळावर जीवन अधिक सोयीस्कर करण्यासाठी अनेक उपयुक्त वस्तूंची निर्मिती केली. या शोधांमुळे मानवी जीवन निश्चितच अधिक सुलभ झाले, परंतु वाढत्या भौतिक गरजा आणि स्वार्थामुळे मानवाला निसर्गाचे अंधाधुंद शोषण करण्याची प्रवृत्तीही वाढली. परिणामी, जी साधने एकेकाळी सोयीची मानली जात होती, तीच आज मानव आणि पर्यावरणासाठी गंभीर संकटाचे कारण ठरत आहेत. प्लास्टिक हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. आज परिस्थिती इतकी चिंताजनक झाली आहे की, आपल्याला मृत्यूसाठी कोणत्याही शस्त्राची गरज उरलेली नाही. आपणच निर्माण केलेले प्रदूषण, भेसळ, नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर आणि प्लास्टिकचा अनियंत्रित वापर यांमुळे अनेक गंभीर आजार उद्भवत असून अकाली मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. प्लास्टिकने केवळ पर्यावरणालाच नाही, तर मानवी आरोग्यालाही गंभीरपणे प्रभावित केले आहे.



प्लास्टिकची सर्वात मोठी समस्या म्हणजे ते नैसर्गिकरीत्या अतिशय दीर्घकाळ नष्ट होत नाही. एकदा वापरल्यानंतर ते शेकडो नव्हे, तर जवळपास हजार वर्षांपर्यंत पर्यावरणात टिकून राहू शकते. कालांतराने ते विघटित होऊन मायक्रोप्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिकमध्ये रूपांतरित होते. हे सूक्ष्म कण माती, पाणी आणि हवेच्या माध्यमातून संपूर्ण अन्नसाखळीत प्रवेश करतात. वैज्ञानिक संशोधनांमध्ये मानवी मेंदू, रक्त, फुफ्फुसे, गर्भातील बाळ तसेच विविध सजीवांच्या शरीरातही प्लास्टिकचे सूक्ष्म कण आढळल्याची पुष्टी झाली आहे. ही बाब भविष्यासाठी अत्यंत गंभीर इशारा आहे.

आपण प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे दररोज अन्न आणि पाण्यासोबत प्लास्टिकचे सूक्ष्म कण शरीरात घेत आहोत. प्लास्टिकचा कचरा पचवता येत नाही. अनेक प्राणी आणि पक्षी प्लास्टिकच्या पिशव्या किंवा इतर प्लास्टिक वस्तू अन्न समजून गिळतात. त्यामुळे त्यांचा मृत्यूही होतो. नद्या, समुद्र आणि जंगलेही प्लास्टिक प्रदूषणामुळे सातत्याने प्रभावित होत आहेत. प्लास्टिक जाळल्यावर निर्माण होणारे विषारी वायू हवेचे प्रदूषण वाढवतात, तर जमिनीत पडून राहिलेल्या प्लास्टिक मधून निर्माण होणारे वायू हवामान बदल आणि जैवविविधतेसाठी धोकादायक ठरत आहेत. प्लास्टिकमध्ये असलेली रासायनिक द्रव्ये हार्मोन्सचे असंतुलन, प्रजननाशी संबंधित समस्या, हृदयविकार, थायरॉईडचे विकार, मधुमेह, श्वसनाचे आजार तसेच कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढवतात. प्लास्टिक उद्योगात काम करणाऱ्या कामगारांमध्ये फुफ्फुसांच्या आजारांचे प्रमाणही अधिक आढळते. त्यामुळे प्लास्टिक प्रदूषण ही आता केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नसून, ती जागतिक सार्वजनिक आरोग्य संकट बनली आहे.

दरवर्षी ३ जुलै रोजी संपूर्ण जगात "आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवीमुक्त दिन" साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांना एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांच्या दुष्परिणामांविषयी जागरूक करणे आणि पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यासाठी प्रेरित करणे हा आहे. हा दिवस केवळ प्रतीकात्मक नसून पृथ्वी, पर्यावरण आणि भावी पिढ्यांचे संरक्षण करण्यासाठीचा जागतिक उपक्रम आहे. जर आपण आजच प्लास्टिकवरील अवलंबित्व कमी केले नाही, तर भविष्यात त्याचे परिणाम अधिक भयावह स्वरूप धारण करू शकतात.

भारतात दरवर्षी सुमारे ५.५ दशलक्ष टन सिंगल-यूज प्लास्टिक कचरा निर्माण होतो. सरासरी प्रत्येक भारतीय नागरिक वर्षभरात सुमारे ११ किलोग्रॅम प्लास्टिकचा वापर करतो. यामध्ये कॅरी बॅग, पॅकेजिंग साहित्य आणि दैनंदिन वापरातील इतर प्लास्टिक वस्तूंचा समावेश असतो. यापैकी जवळपास चार किलोग्रॅम प्लास्टिक हे केवळ सिंगल-यूज प्लास्टिक असते. देशात निर्माण होणाऱ्या सुमारे ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचऱ्यापैकी ४३ टक्क्यांहून अधिक भाग सिंगल-यूज प्लास्टिकचा आहे. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे यापैकी जवळपास १९ टक्के प्लास्टिक कचरा संकलितही होत नाही आणि तो उघड्यावर विखुरला जाऊन माती, जलस्रोत आणि वन्यजीवांना मोठे नुकसान पोहचवतो. चीन आणि अमेरिकेनंतर भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा सिंगल-यूज प्लास्टिक कचरा निर्माण करणारा देश आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने अनेक नियम लागू केले असले तरी अनेक ठिकाणी बंदी घालण्यात आलेल्या प्लास्टिकचा वापर आजही सुरू आहे. दक्षिण आशियात सर्वाधिक घनकचरा निर्माण करणारे राज्य म्हणून महाराष्ट्र ओळखला जाऊ लागला आहे. दुसरीकडे, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांसाठी प्रसिद्ध असलेल्या केरळमध्येही दरवर्षी १,३०,००० टनांहून अधिक प्लास्टिक कचरा निर्माण होतो, त्यापैकी केवळ सुमारे तीन टक्के कचऱ्याचेच पुनर्चक्रण केले जाते.

आपल्या देशातील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक म्हणजे पर्यावरणाबाबत वाढत चाललेली निष्काळजी वृत्ती आणि बेफिकिरी. फारच कमी लोक एखाद्या विषयाची संपूर्ण माहिती घेण्याचा प्रयत्न करतात, तर बहुतेक लोक विचार न करता इतरांचे अनुकरण करत राहतात. जेव्हा वैयक्तिक सोयीला सामाजिक आणि पर्यावरणीय हितापेक्षा अधिक महत्त्व दिले जाते, तेव्हा त्याचे दुष्परिणाम संपूर्ण समाजाला आणि भावी पिढ्यांना भोगावे लागतात. प्लास्टिक प्रदूषण हे त्याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. आजही बंदी लागू असतानाही बाजारपेठांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांचा सर्रास वापर होताना दिसतो. अनेक वेळा दुकानदार नकार देतात, तरीही ग्राहक स्वतः प्लास्टिकच्या पिशव्यांची मागणी करतात. प्रतिबंधित प्लास्टिक वस्तूंच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. हे केवळ नियमांचे उल्लंघन नाही, तर पर्यावरण आणि मानवी आरोग्याविषयीच्या आपल्या बेजबाबदार मानसिकतेचेही द्योतक आहे. त्याचप्रमाणे, रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्याची सवय हळूहळू मोठ्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमध्ये रूपांतरित होते. अशा प्रकाराला विरोध केला किंवा रोखण्याचा प्रयत्न केला, तर अनेकदा वाद निर्माण होतात.

पूर्वी गंभीर आजार प्रामुख्याने व्यसनाधीनता किंवा चुकीच्या जीवनशैलीमुळे होत असत. परंतु आता प्रदूषण आणि पर्यावरणाविषयीची निष्काळजी वृत्ती यामुळे लहान मुले, निरोगी व्यक्ती आणि कोणतेही व्यसन नसलेले लोकही गंभीर आजारांना बळी पडत आहेत. दुभती जनावरे प्लास्टिकच्या पिशव्या गिळतात, सागरी जीव प्लास्टिकच्या कचऱ्यात अडकतात आणि पक्षी प्लास्टिकला अन्न समजून खातात. त्यानंतर या प्राण्यांचे दूध, मांस किंवा इतर उत्पादने मानवी आहाराचा भाग बनतात आणि अशा प्रकारे प्लास्टिकचे सूक्ष्म कण आपल्या अन्नसाखळीत प्रवेश करतात. आज बाजारात जवळपास सर्व प्रकारची प्लास्टिकची भांडी उपलब्ध आहेत. विशेषतः गरम अन्न आणि गरम पेयांसाठी प्लास्टिकचा वापर आरोग्यासाठी अत्यंत घातक मानला जातो, कारण प्लास्टिक मधील हानिकारक रसायने अन्नामध्ये मिसळू शकतात. त्यामुळे कर्करोगासह अनेक गंभीर आजारांच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. आज देशातील जवळपास प्रत्येक गल्ली, परिसर, नातेवाईक किंवा परिचितांमध्ये कर्करोगाचा एखादा रुग्ण आढळतो, ही अत्यंत चिंतेची बाब आहे.

जर आपल्याला आपला देश, समाज आणि पर्यावरण सुरक्षित ठेवायचे असेल, तर बदलाची सुरुवात स्वतःपासून करावी लागेल. पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकार किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. कापडी किंवा ज्यूटच्या पिशव्यांचा वापर करणे, सिंगल-यूज प्लास्टिक टाळणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि पर्यावरणविषयक कायद्यांचे काटेकोर पालन करणे या गोष्टी आपल्या दैनंदिन सवयींचा भाग व्हायला हव्यात. निसर्ग आपल्याला शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि जीवनासाठी आवश्यक असलेली सर्व संसाधने विनामूल्य उपलब्ध करून देतो. त्यामुळे त्यांचे संरक्षण करणे हेही आपले कर्तव्य आहे. जर आपण आज जागरूक झालो नाही, तर त्याची मोठी किंमत भावी पिढ्यांना मोजावी लागेल. प्लास्टिक हे केवळ एक सोयीचे साधन आहे, परंतु मानवी जीवन आणि पर्यावरण त्यापेक्षा कितीतरी अधिक मौल्यवान आहेत. जीवन एकदाच मिळते, त्याचे महत्त्व ओळखा. प्रदूषणाच्या माध्यमातून स्वतःसह इतरांच्या जीवनालाही धोका निर्माण करणे हे अयोग्यच नव्हे, तर गंभीर गुन्हा आहे. म्हणूनच, आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवीमुक्त दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी असा संकल्प करूया की, प्लास्टिकवरील आपले अवलंबित्व कमी करू, पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारू आणि स्वच्छ, निरोगी तसेच सुरक्षित भविष्य घडविण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवू.

**-डॉ. प्रितम गेडाम**

## कांबे राजिप शाळेत विठूनामाचा गजर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा कांबे तालुका खालापूर येथे आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. यावेळी बाल वारकरी ,पालक, संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान, रसायनी सदस्या, शाळा व्यवस्थापन सदस्य टाळ मृदंगाच्या तालावर तल्लीन होऊन अभंग गात विठूरायाच्या दर्शनासाठी पायी वारीत सहभागी झाले. यावेळी दीपक नारायण गोंधळी यांनी सर्व भाविक वारकऱ्यांना केळी वाटप केले, तसेच ज्योत्स्ना काशिनाथ म्हात्रे यांनी वेफर्स वाटप केले. संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान, रसायनी सदस्या बीना रेगे, मनाली भालेराव, रश्मी म्हैसकर, समीक्षा रहाळकर व अनुराधा होनावळे यांनी सर्व विद्यार्थ्यांना राजगिरा चिक्की वाटप केली. या दिंडी सोहळ्यात पालक, ग्रामस्थ यांनी सहभाग घेतला. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बेबीताई गोंधळी यांनी उपस्थिती लावली. मनोहर म्हात्रे, ग्रुप ग्रामपंचायत सदस्य, चांभार्ली यांनी बालकांच्या उत्स्फूर्त सहभागाबद्दल आनंद व समाधान व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यक तेलंगे मॅडम, गायकवाड मॅडम व घायतिडक सर यांनी उत्कृष्ट नियोजन व सूत्रसंचालन केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे लोणिवली, तहसील-पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः -

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे लोणिवली, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील
मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ११८-३ | १-९७-०० | १-१२-६० | ३-०९-६० पैकी ०-७७-४० | २८.०७ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१४** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/०७/२०२६

सही/-
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्कः- ८८८८२७१७५९

### जाहीर नोटीस

रायगड तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल **१) श्री. मुनिरुद्दीन मोइनोद्दीन शेख व २) श्री. झहिरुद्दीन मोइनोद्दीन शेख,** दोघे रा. घर क्र. ३२, रूम नं. ०२, सुरेश पगडे चाळ, दत्ता मंदिराजवळ, रोडपाली रोड, मु. रोडपाली, पो. नावडे, (नवी मुंबई), ता. पनवेल, जि. ४१०२०६ यांनी खालील कोष्टकात वर्णन केलेली मिळकत / मालमत्ता तिचे मूळ मालक **श्री. बुद्धाराम गोमाराम पटेल,** रा. रूम नं. ०७, प्लॉट नं. B-५३, अमृत को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., सेक्टर १४, कळंबोली, (नवी मुंबई), ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१८ यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरवून त्याबाबत खरेदी पूर्व करारनामा (Agreement) निष्पादित केलेला आहे.

**खरेदी करावयाच्या मिळकतीचे वर्णनः**

- **सोसायटीचे नावः अमृत को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. B-५३**
- **सदनिका / युनिट क्र.: रूम नं. ०७ क्षेत्रफळः ३२.०० चौ. मीटर (बिल्ट-अप एरिया)**
- **स्थानः सेक्टर - १४, कळंबोली (नवी मुंबई) तालुकाः पनवेल, जिल्हाः रायगड - ४१०२१८.**

तरी सदर मिळकतीवर/सदनिकेवर अथवा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, ताबा, गहाण, दान/बक्षीसपत्र, वारसा हक्क, भाडेकरार, साठेखत, मृत्यूपत्र, वाटपपत्र, कोर्ट दावा, बोजा, जप्ती, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा व्यवहार किंवा कायदेशीर अडचण असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत आपल्या हरकतीचे किंवा दाव्याचे योग्य कागदपत्रांच्या पुराव्यांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात संपर्क साधावा.

मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत किंवा दावा प्राप्त न झाल्यास, सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क अथवा हितसंबंध नाही आणि असल्यास तो सोडून (Waive) दिला आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे कायदेशीर खरेदीखत व हस्तांतरणाची पुढील प्रक्रिया पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी

**दिनांक : २७/०७/२०२६**

**सही/-**
**ॲड. सर्जिल बिलाल शेख**
**ॲडव्होकेट हायकोर्ट**
**पत्ता : शॉप नं.१४, शुभ शरणम कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. २१, से. १५, कामोठे, नवी मुंबई ४१०२०६**
**मो.बा.०९२२३५५२८८८, ऑफिस : ९२२१२८१४१४**

## पनवेल महानगरपालिका

**वैदयकीय आरोग्य विभाग**

**कार्यालय :- देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी. पनवेल-४१०२०६.**

दुरध्वनी कार्यालय : ०२२- २७४५८०४०/४१/४२ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेलः panvelcorporation@gmail.com फॅक्स नं.: ०२२- २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९ वेबसाईटः www.panvelcorporation.com

### CMC TENDER NOTICE

Online bids are invited from bidders for the Contract (CMC) for the equipment available at ९ PRIMARY HEALTH CENTRES (UPHCs), ९ URBAN HEALTH & WELLNESS CENTRES (UHWCs), and २ HINDU HRIDAY SAMRAT BALASAHEB THAKERY Hospital under the Panvel Municipal Corporation, on behalf of the Commissioner, Panvel Municipal Corporation, Panvel (here in after called the CORPORATION) and will be received online on the website www.mahatenders.gov. in as per time schedule (key dates) in the notice published on the above website. Tenders are being invited online from eligible contractors for "work of CMC of instruments in dispensaries of Panvel asked on Municipal Corporation Area". Online pre bid queries will be mohpmc०५@gmail.com before the stipulated date.

Tender No.: PMC/MOH/०१/२०२६-२७
Date: २८/०७/२०२६

**sd/-**
**Additional Commissioner**
**Panvel Municipal Corporation**

**जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२३४/२४७/२०२६**

### सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. शरद बारकू मळेकर व इतर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड
(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १६६, हिस्सा नं. ३/२/ब)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | ३/२/ब | ०-१२-९० पो.ख ०-००-०० एकुण ०-१२-९० | १.८७ |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**ॲड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

### सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. शरद बारकू मळेकर व इतर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड
(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १६६, हिस्सा नं. ४)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | ४ | ०-२९-१० पो.ख ०-००-०० एकुण ०-२९-१० | ५.५६ |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**ॲड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

### सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. बाबू गोपाळ मळेकर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड
(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १६६, हिस्सा नं. ६/१)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | ६/१ | ०-२७-४० पो.ख ०-००-०० एकुण ०-२७-४० | ५.५० |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**ॲड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

### सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. गुरुनाथ जानू मळेकर व इतर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड
(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १६६, हिस्सा नं. ५/२)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | ५/२ | ०-३५-७० पो.ख ०-००-०० एकुण ०-३५-७० | ६.७२ |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**ॲड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

पान २ वरुन

| | | | |
|---|---|---|---|
| २३२ | १८८ | ३ | ०.३५४० |
| २३३ | १८९ | १ | ०.३३१० |
| २३४ | १८९ | २ | ०.३७५० |
| २३५ | १९० | ० | ०.४२७० |
| २३६ | १९१ | ० | ०.३११० |
| २३७ | १९२ | ० | ०.२७०० |
| २३८ | १९३ | ० | ०.५५४० |
| २३९ | १९४ | ० | ०.३५९० |
| २४० | १९५ | ० | ०.८१९० |
| २४१ | १९६ | ० | ०.३११० |
| २४२ | १९७ | ० | ०.१६७० |
| २४३ | १९८ | १/अ | ०.१९५० |
| २४४ | १९८ | १/ब | ०.१९७० |
| २४५ | १९८ | २ | ०.६६८० |
| २४६ | १९८ | .३/१ | ०.७८२० |
| २४७ | १९८ | .३/२ | ०.०५०० |
| २४८ | १९८ | ४ | ०.६८५० |
| २४९ | १९९ | ० | ०.३८२० |
| २५० | २०० | ० | ०.५२४० |
| २५१ | २०१ | १ | ०.८८०० |
| २५२ | २०१ | २ | ०.८८०० |
| २५३ | २०२ | ० | ०.३४१० |
| २५४ | २०३ | ० | ०.०१५० |
| २५५ | २०४ | १/अ | ०.४५८० |
| २५६ | २०४ | १/ब | ०.४५५० |
| २५७ | २०४ | २/अ | ०.४६८० |
| २५८ | २०४ | २/ब | ०.२४०० |
| २५९ | २३१ | ० | ०.७६०० |
| २६० | २३८ | १ | ०.३४९० |
| २६१ | २३८ | २ | ०.३५४० |
| २६२ | २३८ | ३ | ०.२७६० |
| २६३ | २३८ | ४ | ०.३३४० |
| २६४ | २३९ | ० | ०.९८१० |
| २६५ | २४० | ० | ०.४८१० |
| २६६ | २४१ | १ | ०.३५४० |
| २६७ | २४१ | २ | ०.४००० |
| २६८ | २४१ | ३ | ०.५८६० |
| २६९ | २४३ | ० | ०.७३८० |
| २७० | २४४ | ० | ०.७६०० |
| २७१ | २४५ | ० | ०.४४८० |
| २७२ | २४६ | ० | ०.४४०० |
| २७३ | २४८ | ० | ०.७८१० |
| २७४ | २५० | १ | ०.३५०० |
| २७५ | २५० | २ | ०.४६२० |
| २७६ | २५० | ३ | ०.४४०० |
| २७७ | २५३ | ० | ०.०७६० |
| २७८ | २५४ | ० | ०.१०९० |
| २७९ | २५५ | ० | ०.७२०० |
| | | एकूण | १३७.००७२ |

| मौजे-चिंचवली त.तळोजे, तालूका-पनवेल, जिल्हा-रायगड | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | स.नं./गट नं. | हि.नं. | एकूण (हे.आर) |
| १ | ११ | ० | ०.७९७० |
| २ | १३ | ० | १.०९८० |
| ३ | १५ | १ | ०.११२० |
| ४ | १५ | २ | ०.२२५० |
| ५ | १६ | ० | १.०४०० |
| ६ | १७ | १ | ०.६१५० |
| ७ | १७ | २ | ०.०८६० |
| ८ | १७ | ३ | ०.७५३० |
| ९ | १८ | ० | ०.३७७० |
| १० | १९ | ० | ०.२५८० |
| ११ | २० | ० | ०.५३६० |
| १२ | २१ | १ | ०.०४३० |
| १३ | २१ | २ | ०.१७०० |
| १४ | २१ | ३ | ०.४१०० |
| १५ | २१ | ४ | ०.९११० |
| १६ | २१ | ५ | ०.२४९० |
| १७ | २२ | १ | ०.६७८० |
| १८ | २२ | २ | ०.०६३० |
| १९ | २३ | ० | ०.८८३३ |
| २० | २६ | ० | ०.३५७१ |
| २१ | २७ | ० | ०.१७३३ |
| २२ | २८ | ० | ०.०८२० |
| २३ | ३० | ० | ०.११९० |
| २४ | ३१ | १ | ०.२१०० |
| २५ | ३१ | २ | ०.११६० |
| २६ | ३१ | ३ अ | ०.५६९० |
| २७ | ३१ | ३ ब | ०.३००० |
| २८ | ३१ | ४ | ०.०४३० |
| २९ | ३१ | ५ | ०.२६०० |
| ३० | ३१ | ६ | ०.६८५० |
| ३१ | ३१ | ७ | ०.१४४० |
| ३२ | ३२ | ० | १.०८०० |
| ३३ | ३३ | १ | ०.५९७० |
| ३४ | ३३ | २ | ०.४४०० |
| ३५ | ३३ | ३ | ०.०६८० |
| ३६ | ३३ | ४ | ०.५६७० |
| ३७ | ३३ | ५ | ०.५३४० |
| ३८ | ३३ | ६ | ०.४९८० |
| ३९ | ३४ | १ अ | ०.४२८० |
| ४० | ३४ | १ ब | ०.०६०० |
| ४१ | ३५ | १ | ०.२६०० |
| ४२ | ३५ | २ अ | ०.५३८० |
| ४३ | ३५ | २ क | ०.८६०० |
| ४४ | ३५ | २ ब | १.२२०० |
| ४५ | ३५ | ३ | ०.०५८० |
| ४६ | ३५ | ४ | ०.३००० |
| ४७ | ३५ | ५ | २.५२०० |
| ४८ | ३५ | ६ | ०.३८०० |
| ४९ | ३५ | ७ | ०.३८४० |
| ५० | ३५ | ८ | ०.२३०० |
| ५१ | ३५ | ९ | ०.१४०० |
| ५२ | ३६ | ० | ०.२९०० |
| | एकूण | | २३.८९४७ |

| मौजे-चिंध्रण, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | स.नं./गट नं. | हि.नं. | एकूण (हे.आर) |
| १ | २५ | ० | ०.०८७० |
| २ | २६ | १/अ | १.२००० |
| ३ | २६ | १/ब | १.१९०० |
| ४ | २६ | २ | २.४८०० |
| ५ | २६ | ३ | ०.८८३० |
| ६ | २६ | ४ | १.३३१० |
| ७ | २६ | ५ | ०.०१४४ |
| ८ | २६ | ६ | ०.९४०० |
| ९ | २६ | ७ | ०.९३०० |
| १० | २६ | ८ | ०.२००० |
| ११ | २७ | १ | ०.१६०० |
| १२ | २७ | २ | ०.५३०० |
| १३ | २७ | ३ | ०.६५१० |
| १४ | २७ | ४ | ०.०९०० |
| १५ | २७ | ५ | ०.६७३० |
| १६ | २७ | ६ | ०.२८०० |
| १७ | २७ | ७ | ०.४८१० |
| १८ | २७ | ८ | ०.४००० |
| | | एकूण | १२.५२०४ |

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/०७/२०२६

सही/-
( पवन चांडक )
उपविभागीय अधिकारी , पनवेल
उपविभाग पनवेल

## Sub-Divisional Officer, Panvel Division, Panvel

No. IDC 2026/(File No. 274)/U-14; regarding Mahodar, Chinchavali, and Chindhran, Taluka Panvel, District Raigad; whereas [regarding the notification] issued under Section 1, Sub-section (3) of the Maharashtra Industrial Development Act, 1961 (Maharashtra Act No. III of 1962) and [published in] the Maharashtra Government Gazette, Part IV-B, dated 12 June 2026 Pursuant to the Government Notification dated 12 June 2026 issued by the Industries, Energy and Labour Department (No.IDC 2026/(274) Udyog-14), the Government of Maharashtra has directed that the provisions of Chapter VI of the said Act shall come into force, in the areas specified in the Schedule to that notification, with effect from the 13th day of June 2026.

And whereas, the lands described in the Schedule hereto are situated in an area where the provisions of the said Chapter VI have come into force as aforesaid.

And whereas, under Section 32 of the aforesaid Act, the State Government has been empowered to acquire land necessary for development or for any other purpose in furtherance of the objectives of the said Act within the areas to which Chapter VI of the said Act applies, through the Maharashtra Industrial Development Corporation (hereinafter referred to as "the said Corporation").

And whereas, vide Government Notification dated 12th June 2026 issued by the Industries, Energy and Labour Department (No. IDC 2026/(274) Udyog-14) under Section 2, clause (c) of the said Act, the State Government has specially appointed the Sub-Divisional Officer, Panvel Division, Panvel, District Raigad, to discharge the functions of the District Collector under Sections 32, 33 (sub-section 2), 36, and 38 of the said Act functions which were originally entrusted to the District Collector under Rule 28 of the Maharashtra Industrial Development Rules, 1962.

And whereas, the Sub-Divisional Officer, Panvel Division, Panvel, District Raigad, is of the opinion that the lands described in the accompanying schedule are required by the Corporation for development as an industrial area/industrial estate, or for both.

Accordingly, in exercise of the powers conferred upon the State Government under Section 32, sub-section (2) of the said Act and the said notification, I, Pawan Chandak, Sub-Divisional Officer, Panvel Division, Panvel, District Raigad, hereby call upon you to show cause in writing to the undersigned, before the 14th of August 2026, as to why the lands described herein should not be acquired for the said purpose.

Any agreement entered into, or any expenditure incurred, or any action taken regarding the disposal of the said land whether by way of sale, lease, mortgage, assignment, exchange, or otherwise after the date of this notice and without the approval of the Hon. District Collector Improvements made to the portions of the said land that are ultimately acquired shall not be taken into consideration by the officer determining compensation, pursuant to Section 33, sub-section (5) of the Act and Section 24 (seventhly) of the Land Acquisition Act, 1894 (1 of 1894).

Any person wishing to have a personal hearing may appear before the undersigned either in person or through a legal representative on any day between 11:00 AM and 1:00 PM, by scheduling an appointment within one month from the date of this notice.

| Village - Mohodar, Tal. Panvel, Dist.- Raigad. | | | |
|---|---|---|---|
| Sr.No. | Sr.No./Gat.No. | Hissa No. | Area H.R. |
| 1 | 37 | 1/A | 0.1570 |
| 2 | 37 | 2 | 0.0610 |
| 3 | 38 | 0 | 0.6960 |
| 4 | 39 | 1/A | 0.2380 |
| 5 | 39 | 1/B | 0.2600 |
| 6 | 39 | 1/C | 0.2000 |
| 7 | 40 | 0 | 0.1650 |
| 8 | 41 | 0 | 0.3310 |
| 9 | 42 | 1 | 0.4720 |
| 10 | 42 | 2 | 0.1770 |
| 11 | 42 | 3 | 0.1770 |
| 12 | 42 | 4 | 0.1670 |
| 13 | 42 | 5 | 0.3720 |
| 14 | 42 | 6 | 0.0610 |
| 15 | 43 | 0 | 0.3840 |
| 16 | 44 | 0 | 0.3640 |
| 17 | 45 | 0 | 0.2070 |
| 18 | 46 | 0 | 0.3410 |
| 19 | 47 | 0 | 0.4880 |
| 20 | 48 | 1 | 0.2070 |
| 21 | 48 | 2 | 0.6000 |
| 22 | 49 | 0 Pai. | 1.4200 |
| 23 | 50 | 2 | 0.4750 |
| 24 | 50 | 3/A | 0.1800 |
| 25 | 50 | 3/B | 0.5750 |
| 26 | 50 | 4 | 0.6300 |
| 27 | 50 | 5 | 0.1490 |
| 28 | 51 | 0 | 0.8970 |
| 29 | 52 | 1 | 0.3590 |
| 30 | 52 | 2/A | 0.9430 |
| 31 | 52 | 2/C | 0.8400 |
| 32 | 52 | 2/B | 0.8400 |
| 33 | 53 | 0 | 0.2780 |
| 34 | 54 | 1 | 0.1720 |
| 35 | 54 | 2 | 0.1820 |
| 36 | 54 | 3 | 0.1110 |
| 37 | 58 | 0 | 0.7600 |
| 38 | 63 | 1 Pai. | 0.7000 |
| 39 | 63 | 2/A Pai. | |
| 40 | 63 | 2/B Pai. | 4.5040 |
| 41 | 63 | 1/C | |
| 42 | 64 | 0 | 0.6402 |
| 43 | 69 | 0 Pai | 0.8500 |
| 44 | 95 | 1 | 1.1000 |
| 45 | 95 | 2 | 0.1920 |
| 46 | 78 | 1 | 0.0094 |
| 47 | 78 | 2 | 0.3075 |
| 48 | 78 | 3 | 0.1505 |
| 49 | 79 | 0 | 0.6678 |
| 50 | 80 | 0 | 0.6930 |
| 51 | 81 | Pai | 0.6000 |
| 52 | 96 | 1 | 0.3829 |
| 53 | 96 | 2 | 0.0707 |
| 54 | 96 | 3 | 0.5027 |
| 55 | 97 | 1 | 0.1698 |
| 56 | 99 | 1/A.. | 0.3353 |
| 57 | 99 | 2/A.. | 0.0257 |
| 58 | 99 | 2/B | 0.0400 |
| 59 | 100 | 1/A.. | 0.2800 |
| 60 | 100 | 1/B | 0.4260 |
| 61 | 101 | 1 | 0.0954 |
| 62 | 101 | 2 | 0.1405 |
| 63 | 102 | 1 Pai. | 1.5828 |
| 64 | 103 | 1 | 0.0940 |
| 65 | 103 | 2 | 0.5910 |
| 66 | 108 | 0 | 0.2800 |
| 67 | 109 | 0 | 0.1400 |
| 68 | 110 | 0 | 0.3310 |
| 69 | 111 | 0 | 1.5730 |
| 70 | 112 | 1 | 0.6670 |
| 71 | 112 | 2 | 0.3670 |
| 72 | 113 | 0 | 0.4530 |
| 73 | 114 | 1 | 0.1040 |
| 74 | 114 | 2 | 1.7900 |
| 75 | 115 | 1 | 0.2810 |
| 76 | 115 | 2 | 0.2170 |
| 77 | 116 | 0 | 0.6220 |
| 78 | 117 | 1 | 0.4930 |
| 79 | 117 | 2 | 0.3520 |
| 80 | 118 | 1 | 2.7700 |
| 81 | 118 | 2 | 0.1300 |
| 82 | 119 | 1 | 0.4960 |
| 83 | 119 | 2/A.. | 0.8450 |
| 84 | 119 | 2/B | 0.4000 |
| 85 | 119 | 3 | 0.5970 |
| 86 | 119 | 4 | 0.1260 |
| 87 | 119 | 5 | 0.2250 |
| 88 | 120 | 0 | 0.4650 |
| 89 | 121 | 0 | 0.4930 |
| 90 | 122 | 0 | 0.1900 |
| 91 | 123 | 0 | 0.7540 |
| 92 | 124 | 1 | 0.1670 |
| 93 | 124 | 2 | 0.5460 |
| 94 | 125 | 0 | 0.4300 |
| 95 | 126 | 0 | 0.3600 |
| 96 | 127 | 0 | 0.1870 |
| 97 | 128 | 0 | 0.4500 |
| 98 | 129 | 0 | 0.2200 |
| 99 | 130 | 1 | 0.1420 |
| 100 | 130 | 2 | 0.5740 |
| 101 | 130 | 3 | 0.0930 |
| 102 | 131 | 1 | 0.1590 |
| 103 | 131 | 2 | 0.0630 |
| 104 | 131 | 3 | 0.1900 |
| 105 | 132 | 0 | 0.3340 |
| 106 | 133 | 1 | 0.4880 |
| 107 | 133 | 2 | 2.1790 |
| 108 | 133 | 3 | 0.1620 |
| 109 | 133 | 4 | 0.0450 |
| 110 | 133 | 5 | 0.0400 |
| 111 | 133 | 6 | 0.1770 |
| 112 | 134 | 0 | 0.4270 |
| 113 | 135 | 0 | 0.4270 |
| 114 | 136 | 0 | 0.5600 |
| 115 | 137 | 0 | 1.2200 |
| 116 | 138 | 0 | 0.2280 |

पान ७ वर..

# आयबीचे इशारे डावलले, डॉसियर बदलले

**आर.व्ही.एस. मणी :** उदाहरणार्थ दिल्लीजवळील नगर परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीबाबत आमच्याकडे ठोस गुप्त माहिती होती. तो 'समझौता एक्स्प्रेस'मध्ये चढणार असल्याची माहिती आधीपासून उपलब्ध होती. तरीही स्फोट झाला. या प्रकरणातील मुख्य आरोपींना अवघ्या १४ दिवसांत सोडून देण्यात आले. आमच्याकडे अशी माहिती होती की पाकिस्तानच्या 'आयएसआय'ने कराचीतील संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख आरिफ कसमानी याला हा हल्ला करण्याचे कंत्राट दिले होते. हल्ल्यानंतर भारत सरकारने या प्रकरणाला 'हिंदू दहशतवाद' म्हणून मांडण्यास सुरुवात केली. त्यामुळे 'आयएसआय'ने आरिफ कसमानीला पैसे देण्यास नकार दिला.

त्यांचा युक्तिवाद होता; भारत सरकारच म्हणत आहे की, हा हल्ला हिंदूंनी केला. मग आम्ही तुला पैसे का द्यावेत? यानंतर आरिफ कसमानी अमेरिकेतील माध्यमांकडे गेला. त्याने तिथे स्पष्टपणे सांगितले की, हा हल्ला त्याने केला आहे. अनेक अमेरिकन अहवालांमध्येही आरिफ कसमानीच या हल्ल्यामागे असल्याचे नमूद करण्यात आले, पण भारत सरकार त्यावेळी कायम सांगत राहिले की, हा 'हिंदू दहशतवाद' आहे. स्थिती अशी होती. २०१७पर्यंत कायम राहिली. शेवटी आरोपी निर्दोष मुक्त झाले. विडंबना अशी की जवळपास १० वर्षे अनेक लोक तुरुंगात राहिले आणि ज्याने प्रत्यक्ष हा कट रचल्याचा दावा केला, तो सतत स्वतःची जबाबदारी स्वीकारत होता. कारण त्याला 'आयएसआय'कडून पैसे मिळवायचे होते, अशी त्याची अपेक्षा होती.

अनेक अमेरिकन गुप्तचर अहवालांमध्ये त्याचा उल्लेख आहे, परंतु भारत सरकार त्यावेळी सांगत होते की, हा 'हिंदू दहशतवाद' आहे. मक्का मशीद स्फोटातही अशीच परिस्थिती होती. शरीफुद्दीन आणि मोहम्मद बिलाल यांची नावे आमच्यासमोर आली होती. शरीफुद्दीन हा बेकायदेशीररीत्या भारतात राहणारा बांगलादेशी नागरिक होता. त्याने फरीदाबाद येथून एक सिमकार्ड विकत घेतल्याची नोंद आमच्याकडे होती. मोहम्मद बिलालने स्फोटके ठेवली होती.

एखाद्या मुस्लिम मशिदीत मुस्लिमांनीच का मारले? माझे उत्तर स्पष्ट होते; दहशतवादात धर्म पाहिला जात नाही. असा प्रश्न विचारून तपासाची दिशा बदलता कामा नये. म्हणूनच मी पुन्हा सांगतो; 'Deception' हे पुस्तक वाचले, तर या सर्व घटनांबाबत अधिक तपशील समजतील. 'राष्ट्र से धोखा' या नावाने ते हिंदी भाषेतही उपलब्ध आहे.

**स्मिता प्रकाश :** तुम्ही यापूर्वी असेही म्हटले आहे की, कर्नल पुरोहित यांना अटक होणे हा केवळ योगायोग नव्हता. त्यामागे एक मोठे षड्यंत्र होते आणि पाकिस्तानमधील काही शक्तींना त्यांची प्रगती रोखायची होती.

**आर. व्ही.एस. मणी :** अगदी बरोबर. वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी ते 'सिलेक्शन ग्रेड लेफ्टनंट कर्नल' झाले होते. त्यांच्या गुणवत्तेनुसार ते पुढे किमान 'कोर कमांडर' झाले असते. कदाचित भारतीय लष्कराचे प्रमुख (Chief of Army Staff) होण्याचीही त्यांची क्षमता होती. ते अत्यंत बुद्धिमान आणि सक्षम अधिकारी होते. माझ्या मते पाकिस्तानमधील काही घटकांना ते त्या स्तरापर्यंत पोहचावेत असे वाटत नव्हते.

**स्मिता प्रकाश :** तुम्हाला खरंच वाटते की, पाकिस्तान इतक्या खोलवर प्रभाव टाकू शकत होता?

**आर.व्ही.एस. मणी :** वरिष्ठ नोकरशाही, काही माध्यम गट, काही स्वयंघोषित शांतता मंच, काही राजकीय संपर्क अशा अनेक स्तरांवर वेगवेगळी समीकरणे काम करीत होती. पाकिस्तानमध्ये जाऊन विशेष सन्मान मिळणे ही काही साधी बाब नव्हती. त्यामागे अनेक अर्थ असू शकतात.

**स्मिता प्रकाश :** 'SAFMA' (South Asia Free Media Association) ने एकदा मला विचारले होते, लालू यादव किंवा वझीर आझम तुमच्या इथे पंतप्रधान का नाही बनू शकत?

**आर.व्ही.एस. मणी :** २००६च्या सुमारास 'SAFMA' (South Asia Free Media Association)चे एक प्रतिनिधी मंडळ भारतात आले होते. त्यावेळीही मला काही संशयास्पद बाबी जाणवल्या. पाकिस्तानमधून येणारी अनेक प्रतिनिधी मंडळे केवळ सांस्कृतिक किंवा पत्रकारितेच्या देवाणघेवाणीसाठी येत नसत. त्यांच्यामार्फत अमली पदार्थांची तस्करीही केली जात असल्याची माहिती आमच्याकडे होती. त्याकाळात पाकिस्तानचे काही क्रिकेटपटू भारतात आले होते. शोएब अख्तर आणि मोहम्मद आसिफ यांना पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी भारतातून परत पाठवले होते. त्यांनी स्वतः कबूल केले होते की, त्यांच्या ताब्यात अमली पदार्थ आढळले होते.

**स्मिता प्रकाश :** पण त्यावेळी असे सांगितले गेले होते की, ते पदार्थ त्यांच्या वैयक्तिक वापरासाठी होते.

**आर. व्ही. एस. मणी :** अधिकृत स्पष्टीकरण तसेच होते, परंतु आमच्याकडे उपलब्ध माहितीनुसार हा प्रकार केवळ वैयक्तिक वापरापुरता मर्यादित नव्हता. या घटनेनंतर अवघ्या सहा–सात महिन्यांनी पाकिस्तान क्रिकेट संघाचे प्रशिक्षक बॉब वूल्मर यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाला. त्यांनी या अमली पदार्थांच्या तस्करीला विरोध केला होता, अशी माहिती आमच्याकडे होती. अर्थात या सर्व घटनांतील संबंध समजून घेण्यासाठी अनेक गोष्टी एकत्र पाहाव्या लागतात. त्या काळातील संरक्षण गुप्तचर संस्थेच्या अंदाजानुसार भारतातील सुमारे ३० टक्के दहशतवादी कारवायांचा निधी अमली पदार्थांच्या तस्करीतून मिळत होता. पाकिस्तानकडून भारतात अमली पदार्थांची तस्करी करणे, ही केवळ गुन्हेगारी नव्हती; ती त्यांच्या व्यापक धोरणाचा भाग होती. म्हणूनच आम्ही अनेकदा असे म्हणायचो की, जलालाबाद परिसरात अफूचे उत्पादन चांगले झाले, तर भारतात दहशतवादी कारवाया वाढण्याची शक्यता असते.





**स्मिता प्रकाश :** पण एवढ्या मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांची तस्करी करण्यासाठी पत्रकार, विचारवंत किंवा प्रसिद्ध व्यक्तींचा वापर केला जात असेल, असे तुम्हाला वाटते?

**आर.व्ही.एस. मणी :** मोहम्मद आसिफ, शाहिद आफ्रिदी किंवा शोएब अख्तर हे सामान्य लोक नव्हते. ते आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध क्रिकेटपटू होते. त्यांच्यावर संशय घेणे अनेकांना अवघड वाटत असे. याच कारणामुळे अशा व्यक्तींचा वापर करणे अधिक सोयीचे ठरते. केवळ क्रिकेटपटू नव्हे, तर लेखक, कवी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अशा अनेक प्रतिनिधी मंडळांच्या भेटी होत असत. माझ्या मते तथाकथित 'People–to–People Contact' हा कार्यक्रम अनेकदा चुकीच्या पद्धतीने वापरला गेला, कारण आमच्या अनुभवात अनेकदा याच माध्यमातून खोटे कथानक तयार केले गेले. याच माध्यमातून विविध प्रकारची देवाणघेवाण होत असे आणि त्याच मार्गाने काही बेकायदेशीर हालचालीही घडत असत.

**स्मिता प्रकाश :** पण 'इंटेलिजन्स ब्युरो' (IB) या प्रतिनिधी मंडळांवर लक्ष ठेवत नव्हते का?

**आर.व्ही.एस. मणी :** 'आयबी'चे काम म्हणजे माहिती गोळा करणे आणि सरकारला सतर्क करणे. त्यापुढील कारवाई करणे हे संबंधित मंत्रालय आणि विभागांचे काम असते. 'आयबी'ने अनेक अहवाल दिले, पण त्यावर पुढे काय करायचे हा निर्णय राजकीय नेतृत्वाचा असतो.

**स्मिता प्रकाश :** पण ही प्रतिनिधी मंडळे भारत सरकारच आमंत्रित करीत होते. त्यांना पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवले जात होते. त्यांच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी यंत्रणा वापरली जात होती आणि त्याच वेळी तुमच्याकडे त्यांच्याविषयी संशयास्पद अहवाल येत होते. अशा वेळी तुम्हाला काय वाटत होते?

**आर.व्ही.एस. मणी :** अर्थातच वाईट वाटत होते, पण आमच्या अधिकारांना मर्यादा होत्या. आम्ही फक्त माहिती देऊ शकत होतो. कारवाई करण्याचा अधिकार आमच्याकडे नव्हता. २ आणि ३ जुलै २००७ रोजी भारत–पाकिस्तान गृहसचिव स्तरावरील चर्चा आयोजित करण्यात आली होती. पाकिस्तानचे गृहसचिव कमाल शाह भारतात आले होते, मात्र दुसऱ्याच दिवशी त्यांनी अचानक पाकिस्तानला परतण्याचा निर्णय घेतला. त्याचे कारण होते इस्लामाबादमधील लाल मशीद परिसरातील घटना. त्या प्रतिनिधी मंडळातील इतर सदस्य भारतातच थांबले. आग्रा येथे झालेल्या एका कार्यक्रमादरम्यानही अशाच प्रकारच्या काही




घटना घडल्या. त्या प्रतिनिधी मंडळासाठी नियुक्त करण्यात आलेल्या 'बीएसएफ'च्या एका अधिकाऱ्याने आम्हाला सांगितले की, काही सदस्य काही तास बेपत्ता होत असत आणि नंतर परत येत असत.

तत्कालीन गृहमंत्री शिवराज पाटील असोत किंवा त्यानंतरचे पी. चिदंबरम असोत; आमच्या मते अनेक महत्त्वाच्या इशाऱ्यांवर अपेक्षित कारवाई झाली नाही. २००८नंतर पी. चिदंबरम यांनी पाकिस्तानशी पुन्हा चर्चा सुरू करण्याचा निर्णय घेतला. आमच्या विभागाने स्पष्टपणे नोंद केली होती की, भारतातील वरिष्ठ मंत्री किंवा अधिकारी पाकिस्तानला गेले की त्याच काळात भारतात किंवा जम्मू–काश्मीरमध्ये काही ना काही गंभीर घटना घडत असत. म्हणूनच आम्ही सुचवले होते की, अशा बैठका अत्यंत काळजीपूर्वक आयोजित कराव्यात.

'सार्क' देशांच्या गृहमंत्र्यांच्या परिषदेसाठी पी. चिदंबरम पाकिस्तानला जाणार होते. आम्ही अधिकृतरीत्या नोंद केली होती की, त्यांनी हा दौरा टाळावा, पण परराष्ट्र मंत्रालयाकडून उत्तर आले की, अशा विषयांवर अंतिम निर्णय ते घेतील. त्यानंतर गृहमंत्री पाकिस्तानला गेले आणि योगायोग असा की, त्याच काळात काश्मीरमध्ये प्रथमच दगडफेकीच्या आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली. २००६मध्ये संघाच्या मुख्यालयावर झालेला हल्ला, २००७मधील लाल मशीद प्रकरण, २००८मधील '२६/११' हल्ला हा त्यांचा ठरलेला 'पॅटर्न' होता. यानंतर काही काळ चर्चा थांबल्या, पण २०११मध्ये पुन्हा त्या सुरू करण्यात आल्या. मी त्या काळात पाकिस्तानविषयक 'डॉसियर्स' तयार करणाऱ्या टीममध्ये होतो. आम्ही गुप्तचर संस्था, सुरक्षा यंत्रणा आणि विविध विभागांकडून आलेल्या माहितीच्या आधारे अत्यंत बारकाईने 'डॉसियर' तयार करीत होतो, पण नंतर आमच्या त्या 'डॉसियर'कडे दुर्लक्ष करण्यात आले आणि चिदंबरम यांनी त्यांच्या लाडक्या 'सीबीआय'मार्फत नवे 'डॉसियर' तयार करून घेतले. त्या नव्या 'डॉसियर'मध्ये अनेक तथ्यात्मक चुका होत्या. जसे की भारताने पाकिस्तानात आश्रय घेतलेल्या दोन फरार आरोपींची नावे दिली होती, पण त्यापैकी एकजण त्यावेळी तुरुंगात होता, तर दुसरा दुसऱ्या ठिकाणी असल्याचे समोर आले.

याच कारणामुळे मी अनेकदा म्हणतो की, '२६/११'संदर्भात अनेक गोष्टींचा सखोल आणि निष्पक्ष अभ्यास होणे आवश्यक आहे. मुंबईत झालेल्या '२६/११'च्या दहशतवादी हल्ल्याला 'हिंदू दहशतवादा'शी जोडणे ही काँग्रेस आणि पाकिस्तानची गुप्तचर संघटना 'आयएसआय' यांच्यातील एक 'फिक्स्ड मॅच' होती. मी हे पूर्ण जबाबदारीने सांगतो. १० डिसेंबर २००८ रोजी लोकसभेत तत्कालीन गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी स्वतःहून 'सुओमोटो' निवेदन केले होते. त्या निवेदनात स्पष्ट नमूद आहे की, भारतीय तटरक्षक दल आणि भारतीय नौदलाने पाकिस्तानी समुद्री हद्दीत संशयास्पद नौकेचा मागोवा घेतला होता, मात्र पुढे असे सांगण्यात आले की, त्यानंतर कोणतीही अतिरिक्त गुप्त माहिती मिळाली नाही. त्यामुळे त्या नौकेवरील देखरेख थांबवण्यात आली. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत विचित्र बाब आहे. कोणतीही सुरक्षा यंत्रणा एखाद्या संशयित लक्ष्यावर लक्ष ठेवत असताना, पुढील माहितीवर लक्ष ठेवत असताना, पुढील माहिती मिळाली नाही म्हणून देखरेख थांबवत नाही. उलट अशा परिस्थितीत अधिक दक्षता घेतली जाते. **(क्रमशः)**

---

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त

# ४,००० महिलांना मोफत किचन गार्डन किट

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेश यांच्या माध्यमातून, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून तसेच भाजप नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांच्या सहकार्याने शिरवणे विद्यालय व ज्युनियर कॉलेज, नेरुळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मराठी विज्ञान परिषद माजी संचालिका मृणालिनी साठे प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाला भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस महिला मोर्चा प्रा. वर्षा भोसले, प्रदेश सहसंयोजक महिला मोर्चा सोशल मीडियाच्या बिना गोगरी, भाजप ठाणे–कोकण संवादक अभिजित पेडणेकर, नगरसेविका सायली शिंदे, माजी नगरसेविका उषा भोईर, नेरुळ पश्चिम मंडळ सहप्रभारी उज्ज्वला जगताप तसेच महिला मोर्चाच्या महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष आमदार चित्रा वाघ यांच्या संकल्पनेतून 'देवाभाऊ कृषी माऊली सोहळा' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत शहरी जिल्ह्यातील ४,००० महिलांना घरच्या घरी विषमुक्त शेती करण्यासाठी किचन गार्डन किटचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच शहरी भागातील मर्यादित जागेत उत्तम प्रकारे भाजीपाला कसा पिकवावा यासाठी सोहळ्यात नामांकित नर्सरीचे तज्ज्ञ, हायड्रोपोनिक्स कन्सल्टंट आणि कृषी विभागाच्या शहरी विभागातील अधिकाऱ्यांमार्फत महिलांना आधुनिक गृहकृषीचे सखोल मार्गदर्शन करण्यात येत आहे.



यावेळी शहरी शेती प्रवक्त्या मृणालिनी साठे यांनी सांगितले की, कोणत्याही प्रकारचे रासायनिक खत किंवा कीटकनाशक न वापरता शहरी शेती करता येते, ज्यामधून नवीन काहीतरी शिकायला मिळते, आनंद मिळतो. यातून उत्पन्नही मिळवता येऊ शकते. याद्वारे लावलेल्या भाजीपाला, फळे सेवन केल्यामुळे किमान तेवढे केमिकल पोटात कमी जाते. अशी ही शहरी शेती सगळ्यांनी करावी यासाठी आम्ही आज मार्गदर्शन करतो तसेच कार्यक्रमाच्या मार्गदर्शक मृणालिनी साठे यांनी किचन गार्डनमध्ये कशा प्रकारे छोटी फळझाडे, भाजीपाल्याची झाडे कशी कुंडीत वाढवू शकतो याचे उत्तम मार्गदर्शन केले.

नवी मुंबईतून मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. नेरूळ पश्चिम मंडळ सहप्रभारी उज्ज्वला जगताप यांनी यावेळी सांगितले की, उपस्थित महिलांना एका पर्यावरणपूरक आणि आकर्षक कापडी पिशवीतून पाच प्रकारच्या भाज्यांची उच्च दर्जाची हायब्रीड बियाणे, सेंद्रिय खताची छोटी पिशवी आणि पाण्याचे छोटे स्प्रेअर (कारंजे) देण्यात आले.

---

## उरण महाविद्यालयात नेत्रतपासणी शिबिर

**उरण : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांसाठी नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांच्या वाढदिवसानिमित्त करण्यात आले.

डॉ. सुभाष डवले (नेत्रचिकित्सा अधिकारी, इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय, उरण) यांनी यानिमित्त डोळ्यांची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. वाल्मिक गर्जे यांनी वाढदिवसानिमित्त राबवलेल्या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून नेत्रतपासणी सर्व विद्यार्थ्यांनी करून घ्यावी, असे आवाहन केले. यावेळी ज्येष्ठ प्रा. व्हि.एस. इंदुलकर व तानाजी घ्यार यांच्या हस्ते सरांना पुष्पगुच्छ देऊन दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

---

# 'सीकेटी'त लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त वेशभूषा स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापिका निलिमा शिंदे त्याचबरोबर पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे जनक, प्रखर राष्ट्रभक्त, समाजसुधारक आणि शिक्षणप्रेमी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी (दि. २७) शाळेत अत्यंत श्रद्धापूर्वक अभिवादन करत विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी लोकमान्य टिळक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत स्वातंत्र्यलढ्यातील त्यांचे अमूल्य योगदान, राष्ट्रीय एकात्मतेसाठी केलेले कार्य आणि "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" हा त्यांचा प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांसमोर प्रभावीपणे मांडला. विद्यार्थ्यांनी थोर व्यक्तींच्या भूमिका साकारत वेशभूषा स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन त्यांना आदरांजली वाहिली.

स्पर्धेचे परीक्षण ग्रंथपाल रुचिता घोलप व रवी राजपूत यांनी अगदी काटेकोरपणे करत स्पर्धकांचे कौतुक केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषवाक्ये व प्रेरणादायी विचार सादर करत संपूर्ण वातावरण देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, शाळेच्या ग्रंथपाल रुचिता घोलप, रवी राजपूत, शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. अशा कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांत राष्ट्रप्रेम, देशभक्ती, स्वाभिमानाची भावना अधिक दृढ झाली.

---


## सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. एकनाथ उंदरया मढवी, श्री. मोहिंदर शालिक मढवी व इतर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:–

मौजे– धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड

(पूर्वीचे मौजे–धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १९७, हिस्सा नं. ०)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. |
|---|---|---|
| १३६ | ० | ०–१६–००<br>पो.ख ०–०२–०० |
| | | एकुण ०–१८–०० |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /–**
**ॲड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

## सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. चंद्रकांत अंबाजी मढवी व इतर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:–

मौजे– धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड

(पूर्वीचे मौजे–धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक २३४, हिस्सा नं. ०)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. |
|---|---|---|
| १७२ | ० | ०–४०–७०<br>पो.ख ०–००–०० |
| | | एकुण ०–४०–७० |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /–**
**ॲड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त कष्टकरी महिलांचा सन्मान

**खालापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी (दि. २७) श्री विठ्ठल मंदिर, होराळे येथे शेतकरी-कष्टकरी महिलांचा सन्मान करण्यात आला. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सागर सांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मेळाव्याला उपाध्यक्ष मनिष खवळे, विठ्ठल मोरे शरद कदम, तालुकाध्यक्ष सनी यादव, रवींद्र पाटील, विशाल लोते, नागेश पाटील, श्वेता मनवे, रुमाजी मोरे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला शेतकरी उपस्थित होते.



पान १ वरुन

# पनवेल महानगरपालिकेच्या महासभेत विविध विषयांना मंजुरी

महापालिका हद्दीत अनावश्यक, धोकादायक वाढलेल्या वृक्षांच्या छाटणी केलेल्या फांद्या व पडलेले वृक्ष यांची विल्हेवाट लावण्याकामी ट्रॅक्टर ट्रॉलीसह वूड चीपर मशीन प्रभाग निहायनुसार खरेदी करणे हा विषय महासभेत योग्य उपसूचनांसह मंजूर करण्यात आला. महापालिकेचा सन २०२५-२६ या कालावधीकरिता मुंबई विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेला पर्यावरण सद्यस्थिती अहवाल (ईएसआर) सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबतचा विषय स्थगित करण्यात आला.

महापालिका दिव्यांग कल्याण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेच्या अर्थसहाय्यात वाढ करणेबाबतचा विषय मंजूर करण्यात आला. नितीन देवराम साके यांचा माहिती व जनसंपर्क अधिकारी, गट व पदाचा राजीनामा स्वीकृत करण्याबाबतचा विषय मंजूर करण्यात आला.

प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना या खाणबाधित क्षेत्रातील गरीब व गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी संधी मिळण्याकरिता घरघंटी, शिवणयंत्र, मिरची कांडप डीबीटी तत्त्वावर पुरविण्याबाबतच्या विषयास मंजुरी देण्यात आली. महापालिका क्षेत्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र स्थापन करून धोरण ठरविण्याबाबतचा विषय महासभेत चर्चा करून मंजूर करण्यात आला. समाज विकासमार्फत मनपा हद्दीतील युवक-युवतींना एमएससीआयटी प्रशिक्षण मोफत देण्याबाबतचा विषयही मंजूर करण्यात आला.

महापालिका क्षेत्रातील फरशीपाडा, आडिवली, रोहिंजण व पेणधर येथील शाळांकरिता तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर जागा उपलब्ध करून घेण्याबाबतचा विषय महासभेने मंजूर केला. गणेशोत्सव व नवरात्रोत्सवानिमित्त मनपा हद्दीतील विविध विसर्जन घाट येथे सुविधा पुरविणे, दुरूस्ती करणे व कृत्रिम तलाव बांधण्यास मंजुरी देण्यात आली.

पनवेल शहरातील अं.भू.क्र.१८४/१ ए पार्ट बहुमजली यांत्रिकी वाहनतळ उभारणे प्रस्तावास व खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय स्थगित करण्यात आला. अमरधाम स्मशानभूमी (अ.भू.क्र.१०६) येथील नादुरूस्त गॅस दाहिनी बदलून नवीन गॅस दाहिनी बसवणे (दोन युनिट) या कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळण्याबाबतचा विषयही स्थगित ठेवण्यात आला.

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत प्राप्त प्रथम क्रमांकाच्या बक्षीस रकमेंतर्गत प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात येणाऱ्या सविस्तर प्रकल्प अहवालास (डीपीआर) सर्वसाधारण सभेची मान्यता मिळण्याबाबतचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला.


## सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. प्रकाश कृष्णा पाटील व इतर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड

(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १९२, हिस्सा नं. ०)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २४ | ० | ०-४८-८० पो.ख ०-०२-५० | ८.७२ |
| | | एकुण ०-५१-३० | |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**अॅड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

## सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", श्री. पांडुरंग लक्ष्मण मढवी, श्री. बाळाराम गणपत मढवी व इतर यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड

(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १९४, हिस्सा नं. ०)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. |
|---|---|---|
| १९ | ० | ०-४१-०० पो.ख ०-०५-०० |
| | | एकुण ०-४६-०० |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**अॅड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

## सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. रतन चिंतू पाटील** यांचेकडून सदरहू मिळकत कायमचे खरेदीखताने विकत घेण्याचे ठरवले व मुळ मालक यांनी हे मान्य व कबूल केले, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीच्या वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार केला असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठीत नमूद केल्याप्रमाणे आहे. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणेः-

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड

(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १९३, हिस्सा नं. अ)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २० | अ | ०-२५-८० पो.ख ०-००-०० | ५.१९ |
| | | एकुण ०-२५-८० | |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**अॅड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**

## सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. ओमप्रकाश भंवरलाल छाजेर** यांना खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे अधिकार अभिलेखी नमूद असणारे "मुळमालक", **श्री. दिपक बेडकू पाटील व इतर** यांनी सदर मिळकत कायमचे विकत देण्याचे मान्य व कबूल करून, त्या संदर्भात दोघांच्या संमतीने साक्षीदारांसमक्ष सह्या केलेली दिनांक ०२ जानेवारी, २०१९ रोजीची वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करार असून, सदर व्यवहाराचा तपशील वचनचिट्ठी/बयाणापावती/सामंजस्य करारात नमूद केल्याप्रमाणे आहे. व सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मिळकतीचे वर्णन**

मौजे- धरणागाव, ता. पनवेल व जिल्हा रायगड

(पूर्वीचे मौजे-धानसर, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट क्रमांक १६६, हिस्सा नं. ३/१)

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३४ | ३/१ | ०-२०-७० पो.ख ०-०५-१० | २.५० |
| | | एकुण ०-२५-८० | |

तरी सर्व जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येत आहे की, वरील मिळकती संदर्भात कोणीही मुळ मालक व इतर कोणाबरोबरही कसलाही खरेदीचा व्यवहार व ठराव करू नये. मात्र या उप्परही कोणीही कसलाही खरेदीचा व्यवहार केल्यास, सदरहू खरेदीचा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही. व सदर मिळकतीवर प्रथम हक्काने माझ्या अशिलांचा हक्क व अधिकार राहील. तसेच माझ्या अशीलांची फसवणूक करून व्यवहार केल्यास, ते सर्व कायदेशीर कारवाईस पात्र होतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०७/२०२६

**सही /-**
**अॅड. अस्वले सदिच्छा दिलीप**
**फ्लॅट न. २०३, अ विंग, मोहिनील अपार्टमेंट,**
**नवे पोपुड, नागाव रोड, उरण, रायगड**
**मो. नं. ७४०००९७२८६**


पान ५ वरुन

| | | | |
|---|---|---|---|
| 117 | 139 | 0 | 0.1520 |
| 118 | 141 | 1 | 0.2350 |
| 119 | 141 | 2 | 0.1540 |
| 120 | 141 | 3 | 0.0830 |
| 121 | 141 | 4 | 1.3080 |
| 122 | 141 | 5 A.. | 0.4680 |
| 123 | 141 | 5 B | 0.7890 |
| 124 | 141 | 6 | 0.4150 |
| 125 | 142 | 1A.. | 0.3050 |
| 126 | 142 | 2 A.. | 0.3040 |
| 127 | 142 | B | 0.6100 |
| 128 | 143 | 0 | 0.5160 |
| 129 | 144 | 0 | 1.4970 |
| 130 | 145 | 0 | 0.6800 |
| 131 | 146 | 1 | 0.4200 |
| 132 | 146 | 2 | 0.3690 |
| 133 | 147 | 1/A.. | 0.3060 |
| 134 | 147 | 1/B | 0.3260 |
| 135 | 147 | 2 | 0.4960 |
| 136 | 147 | 3 | 0.2530 |
| 137 | 147 | 5 | 0.2330 |
| 138 | 147 | 6 | 0.9690 |
| 139 | 147 | 7 | 0.3340 |
| 140 | 147 | 8/A.. | 0.5230 |
| 141 | 147 | 8/C | 0.6400 |
| 142 | 147 | 8/B/1 | 1.2790 |
| 143 | 147 | 8/B/2 | 0.4000 |
| 144 | 147 | 9 | 0.1720 |
| 145 | 148 | 0 | 1.6160 |
| 146 | 149 | 1 | 0.1520 |
| 147 | 149 | 2 | 0.1620 |
| 148 | 149 | 3 | 0.4960 |
| 149 | 149 | 4 | 0.3030 |
| 150 | 149 | 5 | 0.4250 |
| 151 | 150 | 0 | 0.5100 |
| 152 | 152 | 0 | 0.4300 |
| 153 | 153 | 0 | 0.6200 |
| 154 | 154 | 1 | 0.1970 |
| 155 | 154 | 2 | 0.3130 |
| 156 | 155 | 1 | 0.6370 |
| 157 | 155 | 2 | 0.5440 |
| 158 | 155 | 3 | 0.2400 |
| 159 | 155 | 4 | 0.0510 |
| 160 | 156 | 0 | 0.1640 |
| 161 | 157 | 1/A.. | 0.8520 |
| 162 | 157 | 1/B | 1.0000 |
| 163 | 157 | 2/A.. | 0.5740 |
| 164 | 157 | 2/B | 0.5610 |
| 165 | 158 | 1 | 0.4400 |
| 166 | 158 | 2/A.. | 0.1870 |
| 167 | 158 | 2/B | 0.1870 |
| 168 | 159 | 0 | 0.5200 |
| 169 | 160 | 1 | 0.9660 |
| 170 | 160 | 2 | 0.0730 |
| 171 | 160 | 3 | 0.6040 |
| 172 | 160 | 4 | 0.1820 |
| 173 | 160 | 5 | 1.0660 |
| 174 | 160 | 6 | 0.4730 |
| 175 | 160 | 7/A.. | 0.5260 |
| 176 | 160 | 7/B | 0.3540 |
| 177 | 160 | 7/C | 0.3030 |
| 178 | 160 | 8 | 0.1820 |
| 179 | 160 | 9 | 0.3950 |
| 180 | 161 | 0 | 0.4880 |
| 181 | 162 | 0 | 0.8500 |
| 182 | 163 | 1 | 0.4630 |
| 183 | 163 | 2 | 0.4370 |
| 184 | 164 | 0 | 0.6580 |
| 185 | 165 | 1/A.. | 0.6840 |
| 186 | 165 | 1/B | 0.3240 |
| 187 | 165 | 3 | 0.3140 |
| 188 | 165 | 6 | 0.6530 |
| 189 | 165 | 7/A.. | 0.3240 |
| 190 | 165 | 7/B | 0.5060 |
| 191 | 165 | 8 | 0.3030 |
| 192 | 165 | 9 | 0.7430 |
| 193 | 165 | 10 | 0.3240 |
| 194 | 165 | 11 | 0.3740 |
| 195 | 165 | 12 | 0.7740 |
| 196 | 166 | 0 | 0.1500 |
| 197 | 167 | 0 | 0.3520 |
| 198 | 168 | 1 | 0.8140 |
| 199 | 168 | 2 | 0.4960 |
| 200 | 168 | 3 | 0.1820 |

| | | | |
|---|---|---|---|
| 201 | 170 | 0 | 0.3520 |
| 202 | 171 | 0 | 0.4980 |
| 203 | 172 | 0 | 0.5700 |
| 204 | 173 | 1 | 0.7480 |
| 205 | 173 | 2 | 0.0130 |
| 206 | 174 | 0 Pai. | 6.5000 |
| 207 | 175 | 0 | 0.2300 |
| 208 | 176 | 0 | 0.5970 |
| 209 | 177 | 0 | 0.3690 |
| 210 | 178 | 0 | 1.1600 |
| 211 | 179 | 1 | 0.1620 |
| 212 | 179 | 2 | 1.3760 |
| 213 | 179 | 3 | 0.3540 |
| 214 | 179 | 4 | 0.1900 |
| 215 | 179 | 5 | 0.0780 |
| 216 | 180 | 1/A.. | 0.3150 |
| 217 | 180 | 1/B | 0.2020 |
| 218 | 180 | 2 | 0.1440 |
| 219 | 180 | 3 | 0.1310 |
| 220 | 181 | 0 | 0.9130 |
| 221 | 182 | 0 | 0.3490 |
| 222 | 183 | 0 | 0.8420 |
| 223 | 184 | 1 | 0.1040 |
| 224 | 184 | 2 | 0.3540 |
| 225 | 185 | 1 | 0.2910 |
| 226 | 185 | 2 | 0.6500 |
| 227 | 185 | 3 | 0.4320 |
| 228 | 186 | 0 | 0.1920 |
| 229 | 187 | 0 | 0.5500 |
| 230 | 188 | 1 | 0.4550 |
| 231 | 188 | 2 | 0.3190 |
| 232 | 188 | 3 | 0.3540 |
| 233 | 189 | 1 | 0.3310 |
| 234 | 189 | 2 | 0.3750 |
| 235 | 190 | 0 | 0.4270 |
| 236 | 191 | 0 | 0.3110 |
| 237 | 192 | 0 | 0.2700 |
| 238 | 193 | 0 | 0.5540 |
| 239 | 194 | 0 | 0.3590 |
| 240 | 195 | 0 | 0.8190 |
| 241 | 196 | 0 | 0.3110 |
| 242 | 197 | 0 | 0.1670 |
| 243 | 198 | 1/A.. | 0.1950 |
| 244 | 198 | 1/B | 0.1970 |
| 245 | 198 | 2 | 0.6680 |
| 246 | 198 | 3/1 | 0.7820 |
| 247 | 198 | 3/2 | 0.0500 |
| 248 | 198 | 4 | 0.6850 |
| 249 | 199 | 0 | 0.3820 |
| 250 | 200 | 0 | 0.5240 |
| 251 | 201 | 1 | 0.8800 |
| 252 | 201 | 2 | 0.8800 |
| 253 | 202 | 0 | 0.3410 |
| 254 | 203 | 0 | 0.0150 |
| 255 | 204 | 1/A.. | 0.4580 |
| 256 | 204 | 1/B | 0.4550 |
| 257 | 204 | 2/A.. | 0.4680 |
| 258 | 204 | 2/B | 0.2400 |
| 259 | 231 | 0 | 0.7600 |
| 260 | 238 | 1 | 0.3490 |
| 261 | 238 | 2 | 0.3540 |
| 262 | 238 | 3 | 0.2760 |
| 263 | 238 | 4 | 0.3340 |
| 264 | 239 | 0 | 0.9810 |
| 265 | 240 | 0 | 0.4810 |
| 266 | 241 | 1 | 0.3540 |
| 267 | 241 | 2 | 0.4000 |
| 268 | 241 | 3 | 0.5860 |
| 269 | 243 | 0 | 0.7380 |
| 270 | 244 | 0 | 0.7600 |
| 271 | 245 | 0 | 0.4480 |
| 272 | 246 | 0 | 0.4400 |
| 273 | 248 | 0 | 0.7810 |
| 274 | 250 | 1 | 0.3500 |
| 275 | 250 | 2 | 0.4620 |
| 276 | 250 | 3 | 0.4400 |
| 277 | 253 | 0 | 0.0760 |
| 278 | 254 | 0 | 0.1090 |
| 279 | 255 | 0 | 0.7200 |
| | | Total | 137.0072 |

**Village-Chichvali T.Taloje, Tal. Panvel, Dist.- Raigad.**

| Sr.No. | Sr.No./Gat.No. | Hissa No. | Area H.R. |
|---|---|---|---|
| 1 | 11 | 0 | 0.7970 |
| 2 | 13 | 0 | 1.0980 |
| 3 | 15 | 1 | 0.1920 |
| 4 | 15 | 2 | 0.2250 |
| 5 | 16 | 0 | 1.0400 |
| 6 | 17 | 1 | 0.6150 |
| 7 | 17 | 2 | 0.0860 |
| 8 | 17 | 3 | 0.7530 |
| 9 | 18 | 0 | 0.3770 |
| 10 | 19 | 0 | 0.2580 |
| 11 | 20 | 0 | 0.5360 |
| 12 | 21 | 1 | 0.0430 |
| 13 | 21 | 2 | 0.1700 |
| 14 | 21 | 3 | 0.4100 |
| 15 | 21 | 4 | 0.9110 |
| 16 | 21 | 5 | 0.2490 |
| 17 | 22 | 1 | 0.6780 |
| 18 | 22 | 2 | 0.0630 |
| 19 | 23 | 0 | 0.8833 |
| 20 | 26 | 0 | 0.3571 |
| 21 | 27 | 0 | 0.1733 |
| 22 | 28 | 0 | 0.0820 |
| 23 | 30 | 0 | 0.1190 |
| 24 | 31 | 1 | 0.2100 |
| 25 | 31 | 2 | 0.1160 |
| 26 | 31 | 3 A.. | 0.5690 |
| 27 | 31 | 3 B | 0.3000 |
| 28 | 31 | 4 | 0.0430 |
| 29 | 31 | 5 | 0.2600 |
| 30 | 31 | 6 | 0.6850 |
| 31 | 31 | 7 | 0.1440 |
| 32 | 32 | 0 | 1.0800 |
| 33 | 33 | 1 | 0.5970 |
| 34 | 33 | 2 | 0.4400 |
| 35 | 33 | 3 | 0.0680 |
| 36 | 33 | 4 | 0.5670 |
| 37 | 33 | 5 | 0.5340 |
| 38 | 33 | 6 | 0.4980 |
| 39 | 34 | 1 A.. | 0.4280 |
| 40 | 34 | 1 B | 0.0600 |
| 41 | 35 | 1 | 0.2600 |
| 42 | 35 | 2 A | 0.5380 |
| 43 | 35 | 2 C | 0.8600 |
| 44 | 35 | 2 B | 1.2200 |
| 45 | 35 | 3 | 0.0580 |
| 46 | 35 | 4 | 0.3000 |
| 47 | 35 | 5 | 2.5200 |
| 48 | 35 | 6 | 0.3800 |
| 49 | 35 | 7 | 0.3840 |
| 50 | 35 | 8 | 0.2300 |
| 51 | 35 | 9 | 0.1400 |
| 52 | 36 | 0 | 0.2900 |
| | Total | | 23.8947 |

**Village-Chindhran, Tal. Panvel, Dist.- Raigad**

| Sr.No. | Sr.No./Gat.No. | Hissa No. | Area H.R. |
|---|---|---|---|
| 1 | 25 | 0 | 0.0870 |
| 2 | 26 | 1/A.. | 1.2000 |
| 3 | 26 | 1/B | 1.1900 |
| 4 | 26 | 2 | 2.4800 |
| 5 | 26 | 3 | 0.8830 |
| 6 | 26 | 4 | 1.3310 |
| 7 | 26 | 5 | 0.0144 |
| 8 | 26 | 6 | 0.9400 |
| 9 | 26 | 7 | 0.9300 |
| 10 | 26 | 8 | 0.2000 |
| 11 | 27 | 1 | 0.1600 |
| 12 | 27 | 2 | 0.5300 |
| 13 | 27 | 3 | 0.6510 |
| 14 | 27 | 4 | 0.0900 |
| 15 | 27 | 5 | 0.6730 |
| 16 | 27 | 6 | 0.2800 |
| 17 | 27 | 7 | 0.4810 |
| 18 | 27 | 8 | 0.4000 |
| | | Total | 12.5204 |

Place - Panvel
Date - 15/07/2026

Sd/-
PAVAN CHANDAK
SUB DIVISIONAL OFFICER, PANVEL
SUB DIVISION PANVEL

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/८७/२०२६

# भारताचा झिम्बाब्वेला व्हाईटवॉश!

## श्रेयसच्या नेतृत्वात पहिली टी-२० मालिका जिंकली




**हरारे : वृत्तसंस्था**

भारत आणि झिम्बाब्वे यांच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील तिसऱ्या सामन्यात टीम इंडियाने झिम्बाब्वेवर ३५ धावांनी विजय मिळवला आहे. या विजयासह भारतीय संघाने झिम्बाब्वेला ३-० असा व्हाईटवॉश केला आहे.

या सामन्यात १५ वर्षाच्या वैभवने झिम्बाब्वेच्या गोलंदाजांना धू-धू धुतले. त्याने आठ चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर ४९ चेंडूंमध्ये ८१ धावांची स्फोटक खेळी केली. त्यालाच सामनावीर आणिण मालिकावीर म्हणून गौरविण्यात आले. वैभवने या मालिकेच्या तीन सामन्यांत १५१ धावा करत लक्ष वेधून घेतले आहे.

कर्णधार श्रेयस अय्यरने या सामन्यात नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. वैभव सूर्यवंशीने आक्रमक फलंदाजी करत पहिल्याच षटकात १७ धावा ठोकल्या, मात्र मुजरबानीने दुसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर अभिषेकला बाद करत भारताला पहिला झटका दिला. यानंतर वैभव आणि ईशान चांगली भागीदारी केली. भारताने पॉवरप्लेमध्ये ६३ धावा केल्या. वैभव ८१ धावांची खेळी करून बाद झाला.

यानंतर ईशान किशनने २९, तर कर्णधार श्रेयस अय्यरने १८ चेंडूंमध्ये २७ धावांची खेळी केली. शेवटी रिंकू सिंहच्या २५ धावांच्या उपयुक्त खेळीच्या जोरावर भारताला झिम्बाब्वेला १९३ धावांचे लक्ष्य देता आले. झिम्बाब्वेसाठी ब्रॅड इव्हान्सनने सर्वाधिक दोन बळी टिपले.

१९३ धावांचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. मयंक यादवने पहिल्याच चेंडूवर ब्रायन बेनेटला शून्यावर बाद केले. झिम्बाब्वेने लागोपाठ चार विकेट्स गमावल्या. अडचणीत सापडलेल्या झिम्बाब्वेसाठी रायन बर्लने एकाकी झुंज दिली. त्याने ४३ चेंडूंमध्ये पाच चौकारांसह नाबाद ५४ धावांची खेळी केली. वेस्ली मढीवेरेने २८ धावांचे योगदान देत त्याला साथ दिली आणि दोघांनी पाचव्या विकेटसाठी ५० धावांची भागीदारी केली, मात्र वाढत्या आवश्यक धावगतीमुळे झिम्बाब्वेवरील दबाव कायम राहिला.

भारतीय गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करत झिम्बाब्वेला मोठी भागीदारी उभारू दिली नाही. मयंक यादवने ३.५ षटकांत २८ धावा देत तीन महत्त्वाचे बळी घेतले. यश ठाकूरने दोन, तर रवी बिश्नोई आणि अशोक शर्मा यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. झिम्बाब्वेला २० षटकांत ७ बाद १५६ एवढीच मजल मारता आली आणि भारताचा ३५ धावांनी विजय झाला. यासह भारताने झिम्बाब्वेविरुद्धची मालिका ३-० अशी जिंकली.

# आयएसएसएफ विश्वचषकात ईशा सिंगचा 'सुवर्ण'वेध

## मनू भाकरला कांस्यपदक



**हांगझोउ : वृत्तसंस्था**

चीनमधील हांगझोउ येथे सुरू असलेल्या आयएसएसएफ विश्वचषकात भारतीय नेमबाजांनी आपला दबदबा कायम ठेवला आहे. महिलांच्या २५ मीटर पिस्तूल क्रीडा प्रकारात भारताच्या ईशा सिंगने सुवर्णपदक पटकावून देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. याच स्पर्धेत भारताची अनुभवी नेमबाज मनू भाकर हिनेही उत्कृष्ट कामगिरी करत कांस्यपदकावर आपले नाव कोरले आहे.

आयएसएसएफ विश्वचषकस्पर्धेत अंतिम फेरीत (२५ मीटर पिस्तूल प्रकारात) ईशा सिंगने सुरुवातीपासूनच दमदार प्रदर्शन केले. संपूर्ण सामन्यात तिने कमालीची अचूकता दाखवत ५० शॉट्‌समध्ये तब्बल ४० गुण मिळवले. या कामगिरीसह तिने यजमान चीनच्या युयुए झांग हिचा तीन गुणांच्या फरकाने पराभव करत सुवर्णपदकावर मोहोर उमटवली.

दुसरीकडे दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती मनू भाकरने कांस्यपदकाच्या लढतीत उत्तर कोरियाच्या ह्योन ग्योंग पाक हिचा पराभव केला. या दोघींमध्ये अत्यंत चुरशीची लढत पाहायला मिळाली. अखेर डबल शूटऑफमध्ये बाजी मारत मनू भाकरने कांस्यपदक जिंकले.

ईशाचे सुवर्ण आणि मनूचे कांस्यपदक मिळून या स्पर्धेत भारताच्या पदकांची एकूण संख्या तीन झाली आहे. याआधी भारताची नेमबाज संयम हिने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात रौप्यपदक जिंकून भारताचे खाते उघडले. भारतीय नेमबाजांच्या या दमदार कामगिरीमुळे आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी भारतीयांच्या मोठ्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

# नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लायन्स क्लब ऑफ पनवेल तसेच नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा ८ व ९ ऑगस्ट रोजी नवीन पनवेल सेक्टर १८मधील सिडको समाजमंदिरात आयोजित करण्यात आली आहे.

शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर प्रवीण सरनाईक आणि पनवेलच्या अध्यक्ष मंगला ठाकूर यांच्या हस्ते ८ ऑगस्ट रोजी सकाळी ९.३० वाजता होईल. यावेळी क्लबचे सेक्रेटरी मिलिंद सूर्यवंशी, खजिनदार सुयोग पेंडसे, स्पोर्ट्स प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोद्दार, नागेश देशमाने, अशोक गिल्डा, चव्हाण, के.एस. पाटील, मदन गोवारी, हेमंत ठाकूर, नंदकिशोर धोत्रे, डायरेक्टर मीना पोद्दार, ज्योती देशमाने, शोभा गिल्डा, भावना जेसवानी, सुरभी पेंडसे यांच्यासह लिओ क्लब ऑफ पनवेलचे अध्यक्ष व सभासद उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धा नवोदित, ११, १३, १५, १७, १९ वर्षांखालील मुले आणि मुली, महिला व पुरुष, ४० वर्षांवरील पुरुष अशा विविध गटांमध्ये घेण्यात येणार आहेत. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि आकर्षक चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरुष व महिला विजयी खेळाडूला संजय पोद्दार यांच्यातर्फे त्यांच्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ भव्य फिरता चषक दिला जाणार आहे. याशिवाय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व खेळाडूंना लायन्स क्लब ऑफ पनवेलतर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेचे चीफ रेफरी म्हणून डी.आर. साळसकर, शामल आणि योगेश पवार यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# भारताने एफआयएच युथ हॉकी फाईव्हस आशियाई चॅम्पियनशिप जिंकली




**मस्कत : वृत्तसंस्था**

भारताच्या सब-ज्युनियर पुरुष संघाने पाकिस्तानला पराभूत करत एफआयएच युथ हॉकी फाईव्हस आशियाई चॅम्पियनशिप जिंकली. अंतिम सामन्यात भारताने कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानला ३-१ने हरवले.

रोमित पाल (५व्या मिनिटाला), कर्णधार केतन कुशवाहा (१२व्या मिनिटाला) आणि शाहरुख अली (१३व्या मिनिटाला) यांच्या गोलांनी भारताचे आशियाई विजेतेपद निश्चित केले. या विजयामुळे भारतीय पुरुष संघ एलिट पूलच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहचला आहे.

अचूक पासिंग आणि शिस्तबद्ध रणनीतीच्या जोरावर भारताने अंतिम सामन्यात सुरुवातीलाच आघाडी घेतली. पहिल्या हाफमध्ये रोमित पालने पाकिस्तानी गोलरक्षकाला चकवून पहिला गोल केला, ज्यामुळे मध्यंतरापर्यंत भारताला १-० अशी आघाडी मिळाली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला कर्णधार केतन कुशवाहाने (१२व्या मिनिटाला) आणखी एक गोल करून भारताला मजबूत स्थितीत आणले. त्यानंतर लगेचच शाहरूख अलीने आणखी एक गोल करून ३-० अशी आघाडी मिळवून दिली. मोहम्मद उस्मानने १६व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे पाकिस्तानने पिछाडी कमी केली, परंतु भारतीय बचावफळीने शेवटच्या मिनिटांमध्ये भक्कम बचाव करत पुढील गोल होऊ दिले नाहीत.

अंतिम फेरीत पोहचल्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही संघांनी एफआयएच युथ हॉकी फाईव्हस विश्वचषकासाठी आधीच पात्रता मिळवली आहे. महिलांच्या गटात भारतीय संघाला विजेतेपद गमवावे लागले आणि त्यांना रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. अंतिम सामन्यात भारताला चीनकडून २-४ असा पराभव पत्करावा लागला.

**बक्षिसांचा वर्षाव**

एफआयएच युथ हॉकी फाईव्हस आशियाई चॅम्पियनशिपमधील प्रभावी कामगिरीनंतर भारतीय पुरुष आणि महिला संघांवर बक्षिसांचा वर्षाव झाला आहे. हॉकी इंडियाने सुवर्णपदक विजेत्या भारतीय पुरुष संघातील प्रत्येक खेळाडूला ₹२,००,००० आणि प्रत्येक सपोर्ट स्टाफ सदस्याला ₹१,००,०००चे बक्षीस जाहीर केले, तर रौप्यपदक विजेत्या भारतीय महिला संघाला प्रत्येक खेळाडूला ₹१,००,००० आणि प्रत्येक सपोर्ट स्टाफ सदस्याला ₹५०,००० मिळाले.

# रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या जलतरणपटूंचे सुयश



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

अलिबाग नगर परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रेसिडेंट ट्रॉफी स्विमिंग चॅम्पियन्स स्पर्धेत उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या सहा जलतरणपटूंनी तब्बल २१ पदके जिंकली.

१२ वर्षाखालील गटात युग म्हात्रे याने चार सुवर्ण (५० मीटर फ्री स्टाईल, ब्रेस्ट्रोक, बटरफ्लाय, बॅकस्ट्रोक); अव्या अजिनने एक रौप्य व तीन कांस्य (५० मीटर फ्रीस्टाइल रौप्य, तर ५० मीटर ब्रेस्ट्रोक, बटरफ्लाय व बॅकस्ट्रोकमध्ये कांस्य); अस्मिता कुमारीने तीन रौप्य (५० मीटर फ्री स्टाईल, ब्रेस्ट्रोक व बॅकस्ट्रोक); सहा वर्षाखालील गटात अगस्त्या घरतने एक सुवर्ण, तीन रौप्य (२५ मीटर फ्री स्टाईल सुवर्ण, तर ब्रेस्ट्रोक, बॅकस्ट्रोक व बटरफ्लायमध्ये रौप्य); मेढावी बडोनी हिने दोन रौप्य व दोन कांस्य (२५ मीटर फ्री स्टाइल व बॅकस्ट्रोकमध्ये रौप्य तर २५ मीटर ब्रेस्ट्रोक व बटरफ्लायमध्ये कांस्य) आणि १४ वर्षाखालील गटात अरिंजय रक्षित याने दोन कांस्य (५० मीटर फ्री स्टाईल व बटरफ्लाय)पदके जिंकली.

या सर्व विजेत्यांचे स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, चेअरमन नगरसेवक परेश ठाकूर, जनरल सेक्रेटरी वाय.टी. देशमुख, व्यवस्थापन समितीचे सदस्य स्वप्नील ठाकूर साहेब आणि मनीषा मॅडम यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# युवा वैभव सूर्यवंशीचा आणखी एक ऐतिहासिक विक्रम!

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटचा नवा सुपरस्टार ठरत असलेल्या वैभव सूर्यवंशीने आणखी एक ऐतिहासिक पराक्रम नावावर केला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून अवघ्या २२ दिवसांतच त्याने सचिन तेंडुलकरचा तब्बल ३४ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडत भारतीय क्रिकेटच्या इतिहासात नाव नोंदवले आहे.

झिम्बाब्वेविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात वैभवने ८१ धावांची तुफानी खेळी करत भारताच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. संपूर्ण मालिकेत त्याने दमदार फलंदाजी करत तीन डावांत केवळ ७७ चेंडूंमध्ये १५१ धावा केल्या. त्याचा स्ट्राइक रेट तब्बल १९६.१० इतका होता. या मालिकेत त्याने दोन अर्धशतके, १५ चौकार आणि नऊ षटकार ठोकत झिम्बाब्वेच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत अपेक्षित कामगिरी न झाल्याने वैभवच्या निवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते, मात्र झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेत त्याने टीकाकारांना उत्तर दिले आहे.



**सचिनचा विक्रम मोडला**

१५ वर्षे १२१ दिवस वय असताना वैभवला 'प्लेयर ऑफ द मॅच' आणि 'प्लेयर ऑफ द सीरिज' हे दोन्ही पुरस्कार मिळाले. यामुळे तो भारताकडून सर्वात कमी वयात हे दोन्ही मानाचे पुरस्कार जिंकणारा खेळाडू ठरला. याआधी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. सचिनला १९९०मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मँचेस्टर कसोटीत १७ वर्षे ११२ दिवस वयात पहिला 'प्लेयर ऑफ द मॅच' पुरस्कार मिळाला होता. आता वैभवने हा ३४ वर्षांपासून कायम असलेला विक्रम मोडीत काढला आहे.

# 'कॉमनवेल्थ'मध्ये भारतीय वेटलिफ्टर्सचा दबदबा

## राजा मुथुपंडीने जिंकले रौप्यपदक



**ग्लासगो : वृत्तसंस्था**

कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारताच्या वेटलिफ्टिंग संघाने दमदार कामगिरी कायम ठेवत आणखी एक पदक जिंकले आहे. पुरुषांच्या ६५ किलो वजनी गटात भारताच्या राजा मुथुपंडीने रौप्यपदकाची कमाई करत देशाच्या खात्यात दिवसातील तिसरे पदक जमा केले. त्याच्या या यशाने भारतीय वेटलिफ्टिंग संघाची विजयी घोडदौड कायम राहिली.

२६ वर्षीय राजा मुथुपंडीने स्पर्धेत एकूण २८६ किलो वजन उचलत (स्नॅच १२६ किलो, क्लीन अँड जर्क १६० किलो) दुसरे स्थान पटकावले. मलेशियाच्या अझनील बिन बिदिन मोहम्मद यांनी तब्बल २९९ किलो वजन उचलून कॉमनवेल्थ गेम्स विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. यासह त्यांनी सलग तिसऱ्यांदा कॉमनवेल्थ गेम्सचे सुवर्णपदक आपल्या नावावर केले.

राजाच्या रौप्यपदकापूर्वी भारताची ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती मीराबाई चानू हिने महिलांच्या ४८ किलो गटात सलग तिसरे कॉमनवेल्थ सुवर्णपदक पटकावले, तर चनंबम ऋषिकांत सिंह याने पुरुषांच्या ६० किलो गटात रौप्यपदक जिंकले. यामुळे दिवसातील भारताची तिन्ही पदके वेटलिफ्टिंगमधूनच आली असून या खेळातील भारताचे वर्चस्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## मयंक यादवने पहिल्याच चेंडूवर विकेट घेत भुवनेश्वरशी केली बरोबरी

**नवी दिल्ली** : भारताचा युवा वेगवान गोलंदाज मयंक यादवने दुखापतीतून पुनरागमन केल्यानंतर झिम्बाब्वेविरुद्ध तिसऱ्या टी-२० सामन्यात डावाच्या पहिल्याच चेंडूवर फलंदाज ब्रायन बेनेट याला बाद केले व एक मोठा विक्रम नावे केला. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये डावाच्या पहिल्याच चेंडूवर विकेट घेण्याचा भुवनेश्वर कुमार याचा भारतीय विक्रम गाठला. भुवनेश्वरनेही हा पराक्रम तीन वेळा केलाय, तर हार्दिक पांड्याने पहिल्या चेंडूवर दोन वेळा विकेट घेतली आहे.

# मीराबाई चानूवर अभिनंदनाचा वर्षाव



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय वेटलिफ्टिंगची स्टार खेळाडू मीराबाई चानूने पुन्हा एकदा इतिहास रचला आहे. ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ४८ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकत मीराबाईने सलग तिसऱ्यांदा राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्ण कामगिरी केली आहे. तिच्या या ऐतिहासिक यशाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी तिचे अभिनंदन केले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मीराबाईच्या कामगिरीचे कौतुक करत म्हटले की, "मीराबाई चानूने भारतीय वेटलिफ्टिंगच्या इतिहासात आणखी एक सुवर्ण अध्याय जोडला आहे." तसेच पुरुषांच्या ६० किलो वजनी गटात रौप्यपदक जिंकणाऱ्या ऋषिकांत सिंगचेही त्यांनी अभिनंदन केले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर मीराबाईचे अभिनंदन करत म्हटले की, तिची कामगिरी ही धैर्य, दृढनिश्चय आणि उत्कृष्टतेचे प्रतीक आहे. तिच्या यशामुळे देशातील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल, असेही राष्ट्रपतींनी नमूद केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com